रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ४६
www.ramprahar.com
◆ मंगळवार, १ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## आजपासून ज्येष्ठ, महिलांना एनसीएमसी कार्ड अनिवार्य



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी महत्त्वाची सूचना आहे. १ सप्टेंबरपासून शासनाच्या सवलतीचा लाभ घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना एनसीएमसी कार्डद्वारेच सवलतीचे तिकीट देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. याबाबतची मानक कार्यप्रणाली (एसओपी) संबंधित आगारांना पाठविण्यात आली आहे. संबंधित प्रवाशांनी हे कार्ड प्रवास करताना सोबत ठेवण्याचे तसेच कार्डमध्ये आवश्यक रक्कम टॉप-अप करून ठेवावी, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे. अमृत ज्येष्ठ नागरिक म्हणजे ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक यांच्या नोंदणी प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अडचणींमुळे (हाताचे ठसे न उठणे) त्यांच्याविषयी सक्ती करण्यास काही काळ वाढवून दिला आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## अंतरंग

गणपती स्पेशल रेल्वे गाड्यांसाठी आरक्षण/२
साडेतीन कोटींची फसवणूक; सूत्रधार जाळ्यात/५
तायक्वांदो स्पर्धेत स्वस्तिक सिंगला सुवर्णपदक/८

# सीजेपी म्हणजे काँग्रेस जिताओ प्रोग्रॅम!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुण्यात हल्लाबोल

**पुणे : प्रतिनिधी**

"सीजेपी याचा अर्थ एखादी छोटी संघटना नाही. सीजेपी म्हणजे 'काँग्रेस जिताओ प्रोग्रॅम' आहे. यात तुम्हाला जे चार-पाच तरुण समोर दिसताहेत, ते फक्त मोहरे आहेत. त्यांच्या बैठकांना भारत जोडोमधल्या त्याच १८० संघटना आहेत, ज्यांनी लोकसभेत भाजपाविरोधात नरेटिव्ह केला. आता तेच पुन्हा नवीन नाव घेऊन मैदानात उतरत आहेत," असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. ३१) येथे केला. ते भाजप प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत बोलत होते.



भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भाजपच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष भारती पवार, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मंत्री चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, आशिष शेलार, राधाकृष्ण विखे-पाटील, पंकजा मुंडे, जयकुमार गोरे, नितेश राणे, माधुरी मिसाळ, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, भाजप प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये, सरचिटणीस आमदार योगेश सागर, आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय कुटे, आमदार माधवी नाईक, सुनील राणे, राजेश पांडे, सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार राम सातपुते, मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्यासह पदाधिकारी, ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"रामायणात कालनेमी होता. तो कधी साधूचा वेश घ्यायचा, तर कधी कुणाचा. वेगवेगळ्या वेशात येऊन त्याचे राक्षसी हेतू साध्य करायचा, पण प्रभू श्रीरामांचे नाव घेतले, तेव्हा कालनेमीही जिंकू शकला नाही. आम्ही प्रभू श्रीरामांनी दिलेल्या तत्त्वांनुसार राज्यकारभार चालवणारे लोक आहोत," असे मुख्यमंत्री म्हणाले.

आपल्या भाषणात मुख्यमंत्री फडणवीस यांनी राहुल गांधी, सोनिया गांधी, काँग्रेस पक्ष व यूपीएतील इतर विरोधी पक्षांना महिला आरक्षण व मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाच्या मुद्द्यावरून लक्ष्य केले. "काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधींना हाच प्रश्न आहे की जेव्हा महिलांना संधी देण्याची वेळ होती, तेव्हा प्रियांका गांधींना संधी का दिली गेली नाही? हे राहुल गांधी व त्यांच्या मातोश्रींनाही सांगावे लागेल," असा सवाल मुख्यमंत्र्यांनी केला.

दरम्यान, ज्यांना कसली अकाऊंटेबिलिटीच नाही अशा लोकांना प्रश्न विचारू शकत नाही, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. "या मुद्द्यांच्या माध्यमातून ते भाजपचा पाऊण भरलेला ग्लासही ते दाखवणार नाहीत. ते फक्त रिकामाच ग्लास दाखवतील. हे ते लोक आहेत, ज्यांना उत्तरेच द्यायची नाहीत. काँग्रेस, उद्धव ठाकरे गट, विरोधी पक्षातील कुणी विचारले तर आम्ही त्यांना विचारू शकतो की आम्ही एवढ्या शाळा सुधरवल्या, तुम्ही किती सुधरवल्या ते सांगा. ते उत्तर देऊ शकत नाहीत, पण हे जे कोण उत्तरदायित्व नसलेले लोक आहेत, त्यांना हा प्रश्न विचारू शकत नाही. हा कार्यपद्धतीतला बदल आहे," असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.

### सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करा

पुण्यातील डीजेच्या वापराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणेकरांना सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव सण साजरा करण्याचे आवाहन केले आहे. "गणेशोत्सवात डीजे वाजला पाहिजे की नाही? या वादात न पडता पुणेकरांनी संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून दिले पाहिजे की सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव कसा साजरा केला जातो. हे फक्त पुणेकरच करू शकतात. त्यांच्यामध्ये ही क्षमता आहे," असे मुख्यमंत्री म्हणाले.

## कार्यकर्त्यांनी अधिक क्रियाशीलता दाखवावी -प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी झटत असताना भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याने आपला जास्तीत जास्त वेळ पक्षकार्याला देत क्रियाशीलता दाखवावी, असे आवाहन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रदेश कार्यकारिणी बैठकीत केले.



उद्घाटनपर भाषणात प्रदेशाध्यक्ष चव्हाण म्हणाले, भाजपने राज्यभरात कार्यकर्त्यांसाठी मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली. राज्य आणि केंद्र सरकारच्या उपलब्धी सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी नव्याने काही वक्ते तयार करता येतील का हे पाहिले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते खंबीरपणे मागील निवडणुका लढल्याने भाजपला राज्यभरात घवघवीत यश मिळाले. त्यामुळे राज्यातील २८ हजार ग्रामपंचायतींपैकी बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये भाजपचे सरपंच आहेत. एवढी मोठी ताकद आणि क्षमता राष्ट्रीयत्वाचा धागा पकडून चालणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांमध्ये आहे.

येत्या काळात राज्यातील युवकांना नशेपासून मुक्त करण्यासाठी या बैठकीच्या निमित्ताने पाऊल उचलले तर महाराष्ट्र हा भाजप कार्यकर्त्यांना कायमस्वरूपी लक्षात ठेवेल. राज्यातील एक लाख ५६ हजार बूथवर कार्यकर्ते तयार व्हायला हवेत आणि प्रत्येक कार्यकर्त्याने कोणती ना कोणती जबाबदारी द्यायला हवी, अशी अपेक्षादेखील प्रदेशाध्यक्षांनी व्यक्त केली.

# एसआयआर प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

## दोन कोटी सात लाख मतदारांची नावे वगळली

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मतदार यादी पुनरीक्षणाची (एसआयआर) प्रारूप मतदार यादी सोमवारी (दि.३१) प्रसिद्ध करण्यात आली. या यादीतून दोन कोटी सात लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

डिजिटायझेशनसाठी फॉर्म जमा न होणे आणि इतर तांत्रिक कारणांमुळे या प्रारूप मतदार यादीत काही मतदारांची नावे समाविष्ट होऊ शकलेली नाहीत. त्याशिवाय पत्त्यावर अनुपस्थित असलेल्या, स्थलांतरित झालेल्या, मृत्यू झालेल्या, परदेशात स्थायिक झालेल्या आणि दुबार मतदारांचाही एसआयआरच्या प्रारूप यादीतून वगळण्यात आलेल्यांमध्ये समावेश आहे.

एसआयआर मोहिमेपूर्वी राज्यात एकूण नऊ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदार होते, मात्र गणना प्रपत्र प्राप्त न झाल्यामुळे किंवा विहित कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे यातील दोन कोटी सहा लाख ८८ हजार ४८७ मतदारांची नावे सध्याच्या प्रारूप यादीतून बाजूला ठेवण्यात आली आहेत. परिणामी आता प्रारूप यादीत सात कोटी ७१ लाख ६५ हजार ५६२ मतदार समाविष्ट असून यामध्ये तीन कोटी ९५ लाख ८९ हजार ९०५ पुरुष, तीन कोटी ७५ लाख ७२ हजार ५७० महिला आणि तीन हजार ८७ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.

दरम्यान, प्रपत्र गोळा न झाल्यामुळे काही मतदारांचे नाव प्रारूप यादीत आलेले नाही. हे मतदार कायमचे बाद झाले असे समजू नका, कारण ही अंतिम यादी नसून केवळ मसुदा आहे. त्याचप्रमाणे कोणाचाही मतदानाचा अधिकार संपुष्टात आलेला नाही, असे राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी स्पष्ट केले आहे.



### प्रारूपातून वगळलेले मतदार

- कायमस्वरूपी स्थलांतरित : ७६.८० लाख मतदार
- अनुपस्थित/संपर्क न झालेले : ७५.५२ लाख मतदार
- मृत व्यक्ती : ३४.८१ लाख मतदार
- दुबार/इतरत्र नोंदणीकृत : १७.६३ लाख मतदार
- इतर : २.२३ लाख मतदार

### ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

*ज्या मतदारांचे नाव एसआयआरच्या प्रारूप मतदार यादीत नसेल ते ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरदरम्यान आपले दावे आणि आक्षेप नोंदवू शकतील. या दाव्यांचे निराकरण करण्याची प्रक्रिया २९ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी एसआयआरनंतरची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.*

### अशी करा प्रक्रिया

*प्रारूप यादीत नाव नसल्यास फॉर्म ६ भरून आवश्यक कागदपत्रांसह नवीन नोंदणीसाठी अर्ज करा. एखाद्या अपात्र व्यक्तीचे नाव चुकून आले असेल, तर त्याच्या नावावर हरकत घेण्यासाठी फॉर्म ७चा वापर करा. नावात किंवा पत्त्यात काही चूक असल्यास फॉर्म ८चा वापर करा, असे निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आले आहे.*

## निवडक

### पंतप्रधान मोदींनी घेतली इराणच्या राष्ट्रपतींची भेट

**बिश्केक :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि.३१) किर्गिस्तानमध्ये होत असलेल्या एससीओ संमेलनादरम्यान इराणचे राष्ट्रपती मसूद पेजेश्कियान यांची भेट घेतली. सध्या आखातामध्ये असलेली तणावपूर्ण परिस्थिती आणि अमेरिका-इराणमध्ये सुरू असलेल्या संघर्षादरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये झालेली ही पहिलीच भेट असल्याने ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

### धावत्या बसमध्ये सामूहिक बलात्कार, दोघांना अटक

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशातून नोएडा येथे चुलत भावाला भेटण्यासाठी निघालेल्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर स्लीपर कोच बसमध्ये सामूहिक बलात्कार झाल्याची घटना राजधानी दिल्लीत घडली. लिफ्ट देण्याच्या बहाण्याने चालक आणि क्लिनर यांनी या मुलीला ग्रेटर नोएडातील परी चौक येथे बसमध्ये बसवले आणि अत्याचार करून आयएसबीटीजवळच्या काश्मीरी गेट रिंग रोडवर उतरवले. याप्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

## ऑगस्टमध्ये सरासरीच्या ५९.३ टक्केच पाऊस!


**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यामध्ये पावसाने ओढ दिली. ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या ५९.३ टक्केच पाऊस झाला आहे. असे असले तरी जुलै महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पडलेल्या पावसाने तारले आहे. आतापर्यंत एकूण वार्षिक पर्जन्यमानाच्या ८५.७ पाऊस झाला.

एल निनोच्या सावटामुळे रायगड जिल्ह्यात जून महिन्यात सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली होती, परंतु जुलै महिन्यात पावसाने जून महिन्याची कसर भरून काढली. पहिल्या १० दिवसांत विक्रमी पाऊस पडला. त्यानंतरही पावसात फारसा खंड पडला नाही. जिल्ह्यात दरवर्षी साधारणपणे जून ते सप्टेंबर या कालावधीत तीन हजार १४८ मिलीमीटर पाऊस पडतो. त्या तुलनेत जून आणि जुलै या दोन महिन्यांत जिल्ह्यात दोन हजार ०९७ मिमी पावसाची नोंद झाली.

जून महिन्यात जिल्ह्यात सरासरी ६५५ मिमी पाऊस पडतो. त्या तुलनेत यावर्षी ३३५ मिमी पाऊस पडला.

### जुलैने तारले



**पावसाची टक्केवारी**

अलिबाग १०३.६, पनवेल ९७.९, कर्जत ८१.३, खालापूर ८९.६, उरण १२६.१, सुधागड ८६.४, पेण ९१.३, महाड ९४.६, माणगाव ९४.८, रोहा ८९.०, पोलादपूर ८४.०१, मुरूड ९५.३, श्रीवर्धन ७३.६, म्हसळा ७५.५, तळा ९१.४

जुलै महिन्याच्या सरसरीच्या तुलनेत जिल्ह्यात १६१ टक्के पावसाची नोंद झाली. जून महिन्यातील पावसाची तूट जूलै महिन्यात भरून निघाली, मात्र ऑगस्ट महिन्यात पावसाची तूट राहिली. ऑगस्टमध्ये जिल्ह्यात सरासरी ८७४.५ मिमी पाऊस पडतो. या तुलनेत यंदा ऑगस्टमध्ये ५१८.५ मिमी पावसाची नोंद झाली. जुलै महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्याने ऑगस्ट महिन्यातील पावसाची तूट भरून निघाली आहे.

जिल्ह्याचे वार्षिक पर्जन्यमान ३१४८.६ मिमी आहे. ऑगस्ट महिन्यापर्यंत जिल्ह्यात २६९७.९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. आतपर्यंत वार्षिक पर्जन्यमानाच्या तुलनेत ८५.७ टक्के पाऊस पडला आहे. उरण तालुक्यात सरासरीपेक्षा जास्त म्हणजेच १२६.१ टक्के पाऊस पडला आहे. अलिबाग तालुक्यात १०३.६ टक्के पावसाची नोंद झाली आहे. इतर तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला. श्रीवर्धन तालुक्यात सर्वात कमी ७३.६ टक्के पाऊस पडला आहे.

जिल्ह्यातील लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत २८ धरणांपैकी २१ पूर्ण क्षमतेने भरली आहेत. यामध्ये ९६.९५ टक्के पाणीसाठा आहे.

## पावसाचा ज़ोर वाढण्याचा अंदाज

**मुंबई :** राज्यात संपूर्ण ऑगस्ट महिन्यात सर्वदूर पावसाचा अभाव असल्याने बहुतांश जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वी वादळी पावसाच्या प्रभावामुळे काही भागांत पावसाची नोंद झाली असली तरीही एकूण पर्जन्यमान कमी राहिले. दरम्यान, पुढील दोन दिवसांत राज्यातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र हळूहळू वायव्य दिशेला पुढे सरकत आहे. या क्षेत्राच्या प्रभावामुळे पुढील दोन दिवसांत राज्यातील विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांसह मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढेल, अशी शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे तसेच यादरम्यान राज्यातील उर्वरित भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

## 'समृद्धी'वरील दरोडाप्रकरणी सात जण पोलिसांच्या ताब्यात

**नाशिक : प्रतिनिधी**

मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गावर प्रवाशांना लुटणाऱ्या आंतरजिल्हा दरोडेखोरांच्या टोळीचा नाशिक ग्रामीण पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत पर्दाफाश केला आहे. या दरोडा प्रकरणातील मुख्य सूत्रधारांसह सात संशयित आरोपींच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या असून इतर पाच फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

नाशिकच्या सिन्नर तालुक्यातील मलढोण आणि दुशिंगपूर शिवारात गुरुवारी मध्यरात्री दरोडेखोरांच्या टोळक्याने वाहनांच्या मार्गात खिळे आणि धारदार लोखंडी वस्तू टाकून वाहनांचे टायर पंक्चर करून लूटमार केली. भयभीत झालेल्या मोटारीतील सर्वांनी अंगावरील सोन्याचे दागिने, घड्याळे आणि ८४ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम असा एकूण १८ लाख नऊ हजार ५०० रुपयांचा ऐवज लुटारूंना दिला. या घटनेनंतर अजून एक प्रकार घडला. त्यावेळी धोका पाहून व्यावसायिकाने स्वतःकडे असलेल्या परवानाधारक बंदुकीतून हवेत दोन गोळ्या झाडल्या. त्यामुळे लुटारू पळून गेले होते.

यानंतर पोलिसांनी धाराशिव जिल्ह्यातील तेरखेडा, पाणगाव, खामकरवाडी आणि उमरा या गावांमध्ये थेट कोंबिंग ऑपरेशन राबवून सात जणांना ताब्यात घेतले तसेच गुन्ह्यात वापरलेली दोन्ही वाहने जप्त केली आहेत. अटक करण्यात आलेले सर्व दरोडेखोर हे धाराशिव जिल्ह्यातील असून किरण गायकवाड, अर्जुन पवार, अशोक शिंदे (मुख्य सूत्रधार), लखन काळे, धनाजी पवार, नितीन शिंदे आणि गोविंद पवार अशी त्यांची नावे आहेत. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## मांडवा-गेट वे जलवाहतूक आजपासून पुन्हा होणार सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

मांडवा (अलिबाग) ते गेट वे ऑफ इंडिया (मुंबई)दरम्यानची फेरीबोट जलवाहतूक सेवा १ सप्टेंबरपासून सुरू करण्यास मेरीटाईम बोर्डाने अनुमती दिली आहे. मुंबईला जोडणारा हा सर्वांत जवळचा आणि वेळेची बचत करणारा मार्ग असून पावसाळ्यात वर्षातील तीन महिने ही सेवा बंद असते.



आता हा मार्ग खुला होत असल्याने मुंबईतील पर्यटकांचा ओघ अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटनस्थळांकडे वाढणार आहे. नऊ महिने मांडवा ते गेट वे ऑफ इंडिया आणि गेट वे ते मांडवा असा बोटीने प्रवास करणाऱ्यांची संख्या १५ लाखांच्या आसपास आहे. दर अर्ध्या तासाने एक फेरीबोट मांडवा बंदरातून सुटते. गर्दीच्या वेळेला ही सरासरी वाढवली जाते.

स्पीडबोट, रो-रोपेक्षा फेरीबोटीचा प्रवास सर्वसामान्यांना परवडणारा आहे. त्याचबरोबर रस्त्यावरील खड्डे, प्रदूषण, वाहतूक कोंडी यापासून सुटका म्हणून विशेषतः अलिबाग आणि मुरुड तालुक्यातील प्रवासी अलिबाग, मुरूडमधील प्रवासी फेरीबोटीचा वापर जास्तीत जास्त करतात. १ सप्टेंबरपासून मांडवा ते गेट वे ऑफ इंडिया हा मार्ग मध्यम आकाराच्या फेरीबोटींसाठी खुला होणार आहे.

### पर्यटकांचा आवडता मार्ग

मुंबईतील पर्यटकांचा हा सर्वांत आवडता मार्ग आहे. ऐतिहासिक गेट वे परिसराचा झगमगाट, प्रदूषणविरहित जलप्रवास, प्रवासादरम्यान सी-गल पक्ष्यांची संगत आणि जलवाहतुकीचा अनुभव घेण्यासाठी मुंबईतील बहुतांशः पर्यटक या मार्गाची निवड करतात. १ सप्टेंबरपासून हा मार्ग खुला होत असल्याने अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटनाला भरारी येईल, अशी आशा येथील व्यावसायिकांना आहे.

## मंगळागौरीतून संस्कृतीच्या जपणुकीसह जनजागृती

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद सदस्य नेहा पारंगे यांच्या माध्यमातून मोहोपाडा येथे मंगळागौरीचा आगळावेगळा कार्यक्रम अनुभवण्यास मिळाला. यावेळी सहभागी मंडळांनी पारंपरिक सादरणीकरणाबराबेरच स्त्री-भ्रूणहत्या रोखा, हुंडाबंदी करा, मुलींना शिकवा, तिचे लग्न १८ वर्षांनंतरच लावा, असे विविध विषय या मंगळागौरीच्या खेळातून मांडत जनजागृतीही केली.



यामध्ये खालापूर, कर्जत, पनवेल, खोपोली येथील १५ मंडळांनी सहभाग घेतला. त्यांनी छान सादरीकरण केले. सखी ग्रुप कांबे यांनी विजेतेपद पटकाविले. द्वितीय क्रमांक चामुंडा ग्रुप खोपोली यांनी मिळवला. मयुरी कदम व सिंकू गुप्ता यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले, तर सूत्रसंचालन संतोष चौधरी यांनी केले.

कार्यक्रमास भाजप महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, पनवेल महापालिका स्थायी समिती सभापती बबन मुकादम, खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी सभापती कांचन पारंगे, माजी सरपंच लक्ष्मणशेठ पारंगे, ताई पवार, ग्रामपंचायत सदस्य भूषण पारंगे, नगरसेविका दर्शना भोईर, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष सुनंदा जमदाडे, कैलास म्हात्रे, सद्गुणा पाटील, नम्रता भोईर, वृषाली म्हात्रे, चित्रा मैंदर्गीकर आदी उपस्थित होते. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी लकी ड्रॉ बक्षीस पैठणी साडी भेट देण्यात आली, तर मलबार गोल्ड ज्वेलर्सच्या माध्यमातून लकी ड्रॉ विशेष आकर्षण भेटवस्तूही देण्यात आली.

### मोहोपाड्यात रंगला खेळ, सखी ग्रुप विजेता



# आजपासून ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना एनसीएमसी कार्ड अनिवार्य

## एक कोटी ११ लाख ७८ हजार ९० लोकांनी केली कार्डची नोंदणी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी महत्त्वाची सूचना आहे. १ सप्टेंबर २०२६ पासून शासनाच्या सवलतीचा लाभ घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना NCMC कार्डद्वारेच सवलतीचे तिकीट देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित प्रवाशांनी NCMC कार्ड प्रवास करताना सोबत ठेवण्याचे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

महामंडळाच्या परिपत्रकानुसार, विविध सामाजिक घटकांना शासन निर्देशानुसार सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा देण्यात येते. या प्रवाशांसाठी NCMC कार्डची नोंदणी व वितरण करण्याचे काम महामंडळाने सुरू केले आहे. यासाठी ई-बिक्स टेक्नॉलॉजीज लि. यांची NCMC कार्ड नोंदणी व वितरणासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांचे NCMC कार्ड नोंदणी व वितरणाचे काम सुरू आहे. त्यानंतर इतर सवलतधारक प्रवाशांसाठीही NCMC कार्ड नोंदणी व वितरणाची कार्यवाही करण्यात येणार आहे.

एसटी महामंडळाकडून देण्यात आलेले NCMC कार्ड ६५-७५ वर्षापर्यंतचे ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना प्रवाशांना १ सप्टेंबर २०२६ पासून अनिवार्य करण्यात येणार आहे. या तारखेपासून ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना शासनाच्या सवलतीचा लाभ घेताना सवलतीचे तिकीट NCMC कार्डमधूनच वितरित करण्यात येणार आहे. याशिवाय, एसटी महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या संबंधित प्रवाशांनी NCMC कार्डचे Top-up (रक्कम भरणे) करून घेणे आवश्यक आहे. याबाबतची मानक कार्यप्रणाली (SOP) संबंधित आगारांना पाठविण्यात आली आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांनी १ सप्टेंबरपूर्वी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून NCMC कार्डची नोंदणी व वितरणाची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, तसेच कार्डमध्ये आवश्यक रक्कम Top-up करून ठेवावी, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.प्रवाशांनी ऐनवेळी होणारी गैरसोय टाळण्यासाठी NCMC कार्डची प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असेही महामंडळाने स्पष्ट केले आहे.




### ज्येष्ठांसाठी मुदतवाढ

अमृत ज्येष्ठ नागरिक म्हणजे ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक यांच्या नोंदणी प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अडचणींमुळे (हाताचे ठसे न उठणे) त्यांच्या विषयी सक्ती करण्यास काही काळ वाढवून दिला आहे.

# डिझेल दरात सवलतीसाठी केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांना मच्छीमारांचे साकडे

**मुरूड : प्रतिनिधी**



डिझेलच्या वाढत्या दरामुळे मासेमारीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला असून, त्याचा थेट परिणाम मासेमारीच्या फेऱ्या, मासळीची आवक आणि मच्छीमारांच्या उत्पन्नावर होत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील मच्छीमारांना डिझेल दरात योग्य ती सवलत मिळावी, यासाठी केंद्रीय पातळीवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

या मागणीसाठी मत्स्य विकास व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या पुढाकाराने खासदार नारायण राणे आणि आमदार निलेश राणे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील मच्छीमारांच्या शिष्टमंडळाने केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांची नवी दिल्लीतील कर्तव्य भवन येथे भेट घेतली.

यावेळी महाराष्ट्र राज्य मच्छीमार संस्था संघाच्या अध्यक्षा ज्योती मेहेर, मुंबई जिल्हा मच्छीमार सहकारी संघाचे अध्यक्ष रामदास पांडुरंग संघ, मुंबई जिल्हा मच्छीमार सहकारी संघाचे संचालक तथा रायगड जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले, रायगड जिल्हा मच्छीमार सहकारी संघाचे अध्यक्ष प्रल्हाद दिनेश पाटील यांच्यासह महाराष्ट्रातील विविध मच्छीमार संस्थांचे अध्यक्ष, संचालक व चेअरमन उपस्थित होते.

डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे सागरी मत्स्यव्यवसायाची आर्थिक व्यवहार्यता अडचणीत आली असून, इंधनावरील खर्च वाढल्याने मच्छीमारांना मासेमारीच्या फेऱ्या कमी कराव्या लागत आहेत. परिणामी मासळीची आवक आणि मच्छीमारांचे उत्पन्न यावरही परिणाम होत असल्याचे शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

या उच्चस्तरीय बैठकीमुळे मच्छीमारांच्या डिझेल सवलतीच्या मागणीला केंद्रस्तरावर नवी दिशा मिळाल्याचे मानले जात आहे. केंद्र सरकारकडून डिझेल दरात सवलत मिळाल्यास महाराष्ट्रातील हजारो मच्छीमारांना मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची शक्यता आहे. तसेच मासेमारीचा खर्च कमी झाल्यास नियमित मासेमारी फेऱ्यांना चालना मिळून मासळीची आवक वाढण्यास आणि मच्छीमारांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

याबाबत बोलताना रायगड जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले म्हणाले की, "डिझेलच्या वाढत्या दरामुळे मच्छीमारांच्या आर्थिक अडचणी दिवसेंदिवस वाढत आहेत. केंद्र सरकारने डिझेल दरात सवलत देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतल्यास महाराष्ट्रातील मच्छीमारांना मोठा दिलासा मिळेल."

# गणपती विशेष रेल्वेगाड्यांमधून १.१७ लाखांहून अधिक प्रवाशांचे आरक्षण

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने आगामी गणपती उत्सवाच्या काळात प्रवाशांची ये-जा सुलभ करण्यासाठी आणि गर्दीचे नियोजन करण्यासाठी २६२ गणपती विशेष गाड्यांच्या सेवांची घोषणा केली आहे. यामुळे आपल्या गावी जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुरक्षित, सुखद आणि सोयीस्कर होणार आहे.गणपती विशेष गाड्यांच्या एकूण २६२ फेऱ्यांमध्ये २०० आरक्षित विशेष गाड्या (ज्यामध्ये वातानुकूलित विशेष गाड्या आणि वातानुकूलित, शयनयान व सामान्य डब्यांचे मिश्रण असलेल्या गाड्यांचा समावेश आहे) आणि ६२ अनारक्षित विशेष गाड्यांचा समावेश आहे. या सेवा मुंबई, पुणे आणि नागपूर येथून कोकण क्षेत्रातील विविध ठिकाणांसाठी जाहीर करण्यात आल्या आहेत.

रेल्वेच्या २०० आरक्षित विशेष गाड्यांमध्ये सावंतवाडी रोडसाठी ११२ (जाण्या-येण्याच्या) सेवा, रत्नागिरीसाठी ६४ सेवा आणि मडगावसाठी २४ सेवांचा समावेश आहे. ९ सप्टेंबर २०२६ पासून सुरू होणाऱ्या या विशेष रेल्वे सेवांसाठी आतापर्यंत १,१७,६८२ प्रवाशांनी आरक्षण केले आहे.या विशेष गाड्या प्रवाशांना प्रवासाचे अतिरिक्त पर्याय उपलब्ध करून देतील आणि त्यांना प्रवासाचे नियोजन आगाऊ करण्यास मदत करतील, ज्यामुळे ते आपल्या गावी पोहोचून कुटुंबीय आणि आप्तेष्टांसोबत गणपती उत्सव साजरा करू शकतील.

उत्सवाच्या काळातील गर्दीत प्रवाशांचा आराम आणि सोय सुनिश्चित करण्यासाठी, मध्य रेल्वेने आपल्या नेटवर्कवर अनेक उपाययोजना केल्या आहेत.यामध्ये तिकीट काढण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी विविध स्थानकांवर अतिरिक्त तिकीट खिडक्यांची व्यवस्था,गर्दीचे उत्तम व्यवस्थापन करण्यासाठी प्रमुख स्थानकांवर प्रवासी प्रतीक्षा क्षेत्र,विविध स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने प्रवाशांसाठी मोफत पिण्याचे पाणी, अन्न आणि स्वच्छतागृहांची सुविधा, विशेष गाड्यांमध्ये प्रवाशांच्या शिस्तबद्ध प्रवेशासाठी रांग व्यवस्थापन प्रणाली, तसेच अतिरिक्त आरपीएफ जवान आणि तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांची नियुक्ती, प्रवाशांची सुरक्षा आणि हालचाल सुरळीत ठेवण्यासाठी स्थानकांवरील महत्त्वाच्या ठिकाणी रेल्वे सुरक्षा बल आणि तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांची वाढीव उपस्थिती राहणार आहे.

शेवटच्या क्षणी होणारी धावपळ टाळण्यासाठी प्रवाशांना गाडी सुटण्यापूर्वी किमान अर्धा तास आधी स्थानकावर पोहोचण्याचा सल्ला दिला जात आहे. वेळेवर पोहोचल्यास गाडीत चढणे सोपे होईल. सर्वांसाठी प्रवास अधिक सुरक्षित व सुखद होईल. गणपती विशेष गाड्यांच्या वेळा, मार्ग आणि थांब्यांबाबतच्या सविस्तर माहितीसाठी, प्रवासी भारतीय रेल्वेच्या चौकशीविषयक संकेतस्थळाला (www.enquiry.indianrail.gov.in) भेट देऊ शकतात किंवा एनटीइएस ॲपचा वापर करू शकतात. सामान्य दरांसह अनारक्षित डब्यांचे आरक्षण युटीएस प्रणालीद्वारे करता येईल. तिकीट आरक्षणासाठी प्रवासी 'रेलवन' ॲप देखील डाउनलोड करू शकतात. प्रवासादरम्यान होणारी गैरसोय टाळण्यासाठी केवळ वैध तिकिटांसह प्रवास करावा आणि सोबत वैध ओळखपत्र ठेवावे, असे आवाहन मध्य रेल्वेकडून प्रवाशांना करण्यात येत आहे.

गणपती उत्सवाच्या काळात प्रवाशांना सुरक्षित आणि सुखद प्रवास सुविधा देण्यासाठी मध्य रेल्वे कटिबद्ध आहे. रेल्वे प्रशासन प्रवाशांच्या विश्वास आणि सहकार्याची दखल घेते; तसेच, प्रवास सुरळीत आणि सुखद होण्यासाठी रेल्वे कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आणि गर्दी व्यवस्थापन व सुरक्षिततेविषयक मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे आवाहन मध्य रेल्वेने सर्वांना केले आहे.

# रेखा रेडीज यांना कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ना.म. जोशी विद्याभवन, गोरेगाव येथे महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सौ. रेखा संजय रेडीज यांना कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे .

रविवार दिनांक ३० ऑगस्ट रोजी गोरेगाव येथे महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे हस्ते रेखा रेडीज यांना राज्यस्तरीय कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले .यावेळी रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले, माजी खासदार धैर्यशील पाटील ,संस्थेचे सदस्य हृदय रेडीज, कार्यकारिणी सदस्य संजय रेडीज, माजी मुख्याध्यापक संतोष रेडीज, अमित रेडीज, आर्यन रेडीज, साक्षी रेडीज,अशोक ल .लोखंडे विद्यामंदिर चे मुख्याध्यापक अकील मुलाणी ,ज्येष्ठ शिक्षक सुखदेव सवईसर्जे उपस्थित होते.




राज्यस्तरीय कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे संस्थेचे अध्यक्ष गणपत जगताप, सेक्रेटरी गोविंद ठाकर, कार्यकारिणी सदस्य खेळू वाजे, संस्थेचे पदाधिकारी, विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी विद्यार्थिनींनी ही अभिनंदन केले.

# तृतीयपंथी भगिनींनी राखी बांधून जपली सामाजिक बांधिलकी

**पाली : प्रतिनिधी**

'रक्षाबंधन' या पवित्र सणाचे औचित्य साधत पालीतील प्रसिद्ध समाजसेवक आणि 'आयुष्य व्यसनमुक्ती केंद्रा'चे अध्यक्ष अंकुश आपटे यांनी एक नवा आणि पुरोगामी पायंडा पाडला आहे. त्यांनी समाजात नेहमीच काही अंशी उपेक्षित आणि अवहेलना सहन करणाऱ्या तृतीयपंथी भगिनींकडून यावर्षी देखील स्नेहाची राखी बांधून घेतली. या विधायक उपक्रमाने अंकुश आपटे यांनी सामाजिक संवेदनशीलतेचा आणि पुरोगामी विचारांचा एक आदर्श वस्तूपाठ समाजासमोर ठेवला आहे.

समाजातील प्रत्येक घटकाला, मग तो तृतीयपंथी समुदाय का असेना, सन्मानाचे आणि हक्काचे स्थान मिळाले पाहिजे या उदात्त हेतूने अंकुश आपटे यांनी हे स्तुत्य पाऊल उचलले आहे. तसेच राखी बांधल्यावर या भगिनींना त्यांनी भेटवस्तू देखील दिली. विशेष म्हणजे, गतवर्षीसुद्धा या तृतीयपंथीयांच्या अडीअडचणीच्या काळात खंबीरपणे पाठीशी उभे राहून त्यांनी या समुदायाचा हक्काचा भाऊ म्हणून आपली जबाबदारी पार पाडली होती.



# तळा तालुक्यात जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनांच्या कामांची अधिकारी करणार पाहणी

**तळा : प्रतिनिधी**

जलजीवन मिशन योजनेंतर्गत तळा तालुक्यात करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचारी गावागावांत उपस्थित राहणार आहेत. रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या आढावा सभेतील सूचनेनुसार ही पाहणी आयोजित करण्यात आली असून, पंचायत समिती तळा ग्रामपंचायत विभागाने याबाबतचे अधिकृत पत्र जारी केले आहे.

खा.सुनिल तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या १७ ऑगस्ट रोजीच्या आढावा बैठकीत तळा तालुक्यातील ग्रामीण पाणीपुरवठा विभागांतर्गत जलजीवन मिशन योजनेंतर्गत झालेल्या कामांची पाहणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार १ सप्टेंबर ते १० सप्टेंबर २०२६ या कालावधीत विविध ग्रामपंचायती व गावांमध्ये अधिकारी प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत.या पाहणीमध्ये उपअभियंता पाणीपुरवठा, विस्तार अधिकारी कृषी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी तसेच ग्रामपंचायत अधिकारी यांचा समावेश आहे.

जलजीवन मिशनच्या योजनेत काही ठिकाणी काम अपूर्ण राहिले असेल, पाणीपुरवठा सुरळीत होत नसेल,पाइपलाईन, पाण्याची टाकी, नळजोडणी अथवा इतर कोणत्याही बाबतीत त्रुटी असतील, तर ग्रामस्थांनी त्या पाहणीसाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात, असे आवाहन करण्यात येत आहे.

ही योजना भविष्यातील दीर्घकालीन ३० वर्षांचा पाणीपुरवठ्याचा विचार करून राबविण्यात आली आहे. त्यामुळे आज उपलब्ध असलेल्या संधीचा उपयोग करून योजनेतील त्रुटी दूर करून घेणे गरजेचे आहे. हा जनतेच्या करातून व शासनाकडून उपलब्ध झालेला निधी आहे,त्यामुळे कामाची गुणवत्ता आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळणे हा ग्रामस्थांचा अधिकार आहे.

### पाणीपुरवठा समितीच्या पाहणीच्या तारखा

१ सप्टेंबर रोजी वृंदावन (भानंगकोड ), भानग, तांबडी.
२ सप्टेंबर :उसरखुर्द , बेलघर , खैराट .
३ सप्टेंबर :मेढे , टोकार्डे , कोणथरे , पढवण , म्हसाडी
४ सप्टेंबर :कळमशेत , वावे हवेली, गिरणे .
७ सप्टेंबर :मालुककोंड , मालुकवाडी .
येथे जनजीवन मिशनच्या कामाची पहाणी होणार अहे.तर खांबवली, शेणवली, शेनाटे, ताम्हाणी त. तळे, बोरीचा माळ, वांजळोशी, चोरवली, चरई बु., दहिवली त. तळे, कासेखोल आणि वानस्ते. बारपे महागाव, वाशी महागाव, विनवली, कोरखंडा, महुरे, सालशेत, फळशेतकर्नाळा, गौळवाडी आणि काकडशेत या गावांमध्ये जलजीवन मिशनच्या कामांची पाहणी ८ ते १० सप्टेंबर पर्यंत करण्यात येणार आहे.

# 'विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसोबत मानसिक आरोग्याचे संगोपनही गरजेचे'

**मुंबई : प्रतिनिधी**

बदलत्या काळातील वाढती स्पर्धा लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच त्यांच्या मानसिक आरोग्याचे संगोपन करणे काळाची गरज आहे. यश आणि अपयश हे आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत, ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे आवश्यक असल्याचे मत महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी व्यक्त केले.

अंजुमन-ए-इस्लाम संचलित सैफ तय्यबजी गर्ल्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे वर्ल्ड मेमन ऑर्गनायझेशन (डब्ल्यूएमओ) इंडिया आणि यामा पटेल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामाजिक उपक्रमात गरजू पालकांना रेशन किटचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे बोलत होत्या.




यावेळी अंजुमन-ए-इस्लामचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. झहीर आय. काझी, सैफ तय्यबजी गर्ल्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या अमीना काझी, अंजुमन-ए-इस्लामचे वरिष्ठ उपाध्यक्ष मुश्ताक अंतुले, वर्ल्ड मेमन ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष हाजी हसीन आघाडी, यामा पटेल फाउंडेशन तसेच डब्ल्यूएमओ मुंबईचे शहर अध्यक्ष हाजी मुदस्सर पटेल, हाजी इम्तियाज मोटरवाला, नसीन मकलाई, हुरिया पटेल आणि मुमताज परफ्यूमवाला यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, अंजुमन-ए-इस्लाम ही संस्था शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात प्रशंसनीय कार्य करत आहे. बदलत्या काळानुसार आणि प्रचंड स्पर्धेच्या युगात येणाऱ्या पिढीला योग्य शिक्षण देणे हे सर्वांत महत्वाचे काम आहे. गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य बळकट करणे आवश्यक आहे. तसेच शिक्षण व मूलभूत सुविधांसाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे.

पद्मश्री डॉ. झहीर आय. काझी यांनी संस्थेच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची माहिती दिली. अंजुमन-ए-इस्लामची स्थापना १५२ वर्षांपूर्वी झाली असून स्वातंत्र्यसंग्रामातही संस्थेने योगदान दिले असल्याचे त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या संदेशासोबत अंजुमन-ए-इस्लाम 'बेटी बचाओ, बेटी पढाओ आणि बेटी बसाओ' या संकल्पनेवर काम करत आहे. अनाथ मुलींचे शिक्षण, विवाह आणि पुनर्वसनाची जबाबदारीदेखील संस्था पार पाडत असल्याची माहिती त्यांनी दिली.

ईद-ए-मिलादच्या पर्वानिमित्त आयोजित या उपक्रमाला लाभार्थी पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी गरजू कुटुंबांना जीवनावश्यक अन्नधान्य उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. मानवतेची सेवा आणि गरजूंच्या मदतीसाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेणच्या चावडी नाका मंडळातर्फे रक्तदान शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

श्रीकृष्ण जन्माष्टमी व श्रीगणेशोत्सव मंडळ, चावडी नाका, हनुमान आळी, पेण यांच्यावतीने आयोजित भव्य रक्तदान शिबिर रविवार दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाले. श्री रामेश्वर देवस्थान सभागृह, पेण येथे सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत हे शिबिर पार पडले. यासाठी एम.जी.एम. हॉस्पिटल रक्तपेढी, कळंबोली यांचे विशेष सहकार्य लाभले. मंडळाची ११४ वर्षांची परंपरा असून दरवर्षीप्रमाणे यंदाही १५० बाटल्यांचे रक्तदान करण्यात आले आहे. सकाळपासूनच रक्तदात्यांनी गर्दी केली होती.

यावेळी अध्यक्ष समीर साने आणि खजिनदार प्रसन्ना मोडक यांनी सांगितले की, आमचे सर्व उपक्रम कार्यकर्त्यांच्या वर्गणीतून, कोणताही राजकीय हेतू न ठेवता राबवले जातात. उत्सवाबरोबरच सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान, वृक्षारोपण, गरजू विद्यार्थ्यांना मदत असे उपक्रम आम्ही गेली अनेक वर्षे करत आहोत. "रक्तदान - सामाजिक जाण, कर्तव्य आणि जबाबदारी ही...!" या संदेशाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.



# हत्तीरोग निर्मूलनासाठी पनवेल पालिका सज्ज!

## स्थलांतरितांचा नाईट सर्व्हे सुरू, २६ केंद्रांवर विशेष मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत स्थलांतरित लोकसंख्येचे सर्वेक्षण व रात्री रक्तनमुने संकलित करण्याची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच संबंधित यंत्रणांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त मंगेश चितळे यांनी दिल्या आहेत.



हत्तीरोग रुग्णशोध मोहिमेंतर्गत महापालिकेच्या वतीने ब्लॉकनुसार रात्री रक्तनमुने संकलन सर्वेक्षण करण्यात येत आहे. या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत अतिजोखमीची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून येथे रात्री रक्तनमुने संकलित करण्यात येत आहेत. स्थलांतरित कामगारांमध्ये हत्तीरोगाचा संसर्ग शोधण्यासाठी रात्री आठनंतर रक्ताचे नमुने संकलित करण्यात येत आहेत. अतिजोखमीच्या भागांमधून हत्तीपाय आणि अंडवृद्धी रुग्णांची सर्वाधिक संख्या असलेले भाग निवडण्यात आले आहेत. तसेच झोपडपट्ट्यांचे प्रभाग, मोठ्या स्थलांतरित लोकसंख्येच्या वसाहती असलेली क्षेत्रेदेखील निवडण्यात आल्याची माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली.

राष्ट्रीय मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र स्थलांतरित लोकसंख्येमध्ये रात्री रक्त सर्वेक्षण आयोजित करून रक्तनमुने संकलित केले जात आहेत. संकलित नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी करून सर्व नोंदी अद्ययावत ठेवण्यात येत आहेत. तपासणीमध्ये मायक्रोफिलेरिया बाधित व्यक्ती आढळल्यास त्यांच्यावर तातडीने



उपचार सुरू करून उपचार पूर्ण होईपर्यंत आवश्यक पाठपुरावा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

स्थलांतरित कामगारांमध्ये हत्तीरोगाबाबत जनजागृती, रक्त तपासणीचे महत्त्व, औषधोपचाराचे पालन आणि माहिती-शिक्षण-संवाद उपक्रम प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच नियमित हत्तीरोग कार्यक्रमातील इतर उपक्रम राबविण्यात येत आहेत. हत्तीरोगाच्या प्रतिबंधासाठी पात्र स्थलांतरित कामगारांनी रक्त तपासणी करून घेऊन आरोग्य विभागाच्या सूचनांना सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

# रेशन धान्य वितरणातील अनियमिततेची चौकशी करा

## नगरसेविका डॉ. अस्मिता घरत यांची पुरवठा विभागाकडे तक्रार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पालिका हद्दीतील नवीन पनवेल परिसरातील रेशन दुकान क्रमांक १६ व १९ येथे धान्य वितरणाबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत असल्याने याची तातडीने चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी प्रभाग क्रमांक १७च्या नगरसेविका डॉ. अस्मिता घरत यांनी पनवेलच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पुरवठा अधिकाऱ्यांकडे केली आहे.



डॉ. घरत यांच्या तक्रारपत्रानुसार जुलैच्या धान्य वितरणासाठी लाभार्थ्यांकडून जुलै महिन्यातच ओटीपी घेण्यात आले. संबंधित धान्य ७ ऑगस्टला वाटप करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते, मात्र त्या दिवशी वाटप झाले नसल्याची तक्रार आहे. २९ ऑगस्टपासून वितरण सुरू करण्यात आले तसेच जुलैचे धान्य असल्याचे संबंधित दुकानदाराकडून सांगण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

ऑगस्टचे ओटीपी काही लाभार्थ्यांकडून आधीच घेण्यात आले असतानाही ऑगस्टचे धान्य अद्याप आलेले नसल्याचे दुकानदाराकडून सांगण्यात आल्याचे डॉ. घरत यांनी म्हटले. पुरवठा विभागाकडे चौकशी केली असता ऑगस्टचे धान्य संबंधित रेशन दुकानदाराला यापूर्वीच प्राप्त झाल्याची माहिती मिळाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

निर्धारित प्रमाणापेक्षा कमी धान्य दिल्याच्या तक्रारीही आहेत. पाच किलोऐवजी केवळ दोन ते तीन किलो धान्य दिले जात असल्याचा आरोप आहे. काही महिलांना गहू मिळत नसल्याच्या तक्रारीही असल्याचे डॉ. घरत यांनी नमूद केले.

रेशनवरील धान्य अन्नसुरक्षेशी संबंधित असल्याने अशी अनियमितता गंभीर आहे. त्यामुळे जुलै व ऑगस्ट महिन्यांत संबंधित रेशन दुकानांना प्रत्यक्षात किती व कोणत्या तारखेला धान्य प्राप्त झाले याची तपासणी करावी, अशी मागणी डॉ. अस्मिता घरत यांनी केली आहे.

ओटीपी घेऊन धान्य वितरण न करणे, निर्धारितपेक्षा कमी धान्य देणे तसेच वितरणाबाबत विसंगत माहिती या सर्वांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# रायगड जिल्हा शांतता समितीवर राकेश खारकर यांची नियुक्ती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा शांतता समितीच्या सदस्यपदी नवीन पोसरी (मोहोपाडा) येथील सामाजिक व राजकीय कार्यकर्ते राकेश खारकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



त्यांच्या सामाजिक आणि सार्वजनिक कार्याची दखल घेत प्रशासनाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. या निवडीबद्दल रसायनी-मोहोपाडा तसेच खालापूर परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राकेश खारकर स्थानिक पातळीवर सक्रिय सामाजिक व राजकीय कार्यकर्ते असून वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य आहेत. त्यांच्याकडे भारतीय जनता पक्षाच्या वासांबे विभागीय अध्यक्षपदाची जबाबदारी आहे. राजकीय पदासोबतच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी परिसरातील विविध लोकोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे.

दरम्यान, त्यांच्या विविध सामाजिक कार्याची दखल घेत रायगड जिल्हा शांतता समितीच्या सदस्यपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवरील सामाजिक सलोख्याच्या कार्याला आता जिल्हास्तरीय व्यासपीठ मिळाले आहे. या नियुक्तीबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवर, ग्रामस्थ तसेच भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राकेश खारकर यांचे अभिनंदन केले आहे.

# गव्हाण विद्यालयात कौशल्याधिष्ठित गुरुकुल २.० प्रकल्प

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांपैकी एक असून संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणारा 'रयत गुरुकुल प्रकल्प' हा महाराष्ट्रात नावाजलेला शैक्षणिक उपक्रम आहे. बदलत्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता विविध कौशल्यांचा विकास व्हावा, या उद्देशाने संस्थेने कौशल्याधिष्ठित शिक्षणावर विशेष लक्ष केंद्रित केले असून 'गुरुकुल २.०' हा अभिनव प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे 'गुरुकुल २.०'ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शनिवारी (दि. २९) इयत्ता ५ वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांच्या पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेस पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



यावेळी स्थानिक स्कूल कमिटी सदस्य विश्वनाथ कोळी, प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, गुरुकुल विभागप्रमुख संदीप भोईर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स विभागप्रमुख शीतलकुमार म्हात्रे व गुरुकुल वर्गाचे शिक्षक उपस्थित होते.

प्रतिज्ञा घरत यांनी मान्यवर व पालकांचे स्वागत केले. सभेत शीतलकुमार म्हात्रे यांनी 'गुरुकुल २.०' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कौशल्याधिष्ठित उपक्रमांची माहिती दिली. आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देताना विद्यार्थ्यांच्या सुप्त कौशल्यांना वाव देणे आणि भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम करणे उपक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गुरुकुल विभागप्रमुख संदीप भोईर यांनी 'गुरुकुल २.०'ची संकल्पना, स्वरूप, उद्दिष्टे आणि विद्यार्थ्यांना होणारे फायदे याबाबत मार्गदर्शन केले. बदलत्या काळाची गरज ओळखून सर्वांगीण विकासासाठी कौशल्याधिष्ठित शिक्षण किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी सांगितले.

उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे म्हणाले, ही शाळा तुमची-आमची आहे. येथे शिकणारे तुमचे पाल्य हे आमचे विद्यार्थी आहेत. त्यामुळे शाळेविषयी प्रत्येकाच्या मनात आदर, निष्ठा आणि कर्तव्याची भावना असणे गरजेचे आहे. विश्वनाथ कोळी यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी सकस व पौष्टिक आहाराचे महत्त्व अधोरेखित करत पालकांना जागरूक राहण्याचे आवाहन केले. समारोपप्रसंगी प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेची परंपरा, संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य आणि 'कमवा आणि शिका' तसेच 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' या विचारांचे महत्त्व विशद केले.

पालकांकडे असलेली विविध कौशल्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांचा उपयोग व्यक्तिमत्त्व विकास आणि शाळेच्या प्रगतीसाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्यांच्या आवाहनाला पालकांनी सकारात्मक प्रतिसाद देत "ज्यांच्याकडे जे कौशल्य आहे, ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून शाळा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी उपयोग करू," असा एकमुखी निर्धार व्यक्त केला आणि सर्वतोपरी सहकार्याचे अभिवचन दिले.

## निवडक

### पुष्पकनगर परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल** : पनवेलजवळील नव्याने विकसित होत असलेल्या पुष्पकनगर परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाइकांचा शोध पनवेल शहर पोलीस घेत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ४० वर्षे आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक सुनील सरगर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### सोन्याच्या बांगडीची चोरी

**नवीन पनवेल** : बसमध्ये चढताना महिलेच्या हातातील सोन्याची बांगडी कट करून चोरून नेल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात २६ ऑगस्ट रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला २५ ऑगस्टला दुपारी चार ते साडेचारदरम्यान पनवेल बस डेपोमधून बाहेर येऊन कल्याणला जाण्यासाठी एनएमएमटी बस पकडण्यासाठी पनवेल बस डेपोबाहेर ब्रिजखाली उभ्या होत्या. दरम्यान, एनएमएमटी महामंडळाची बस पनवेल रेल्वे स्थानक ते बैल बाजार कल्याण येथे आली असता बसमध्ये चढताना त्यांच्याकडे दोन बॅगा असल्याने गर्दीचा फायदा घेत अज्ञाताने त्यांच्या हातातील १३ ग्रॅम वजनाची सोन्याची बांगडी कट केली. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### १० लाखांची फसवणूक

**नवीन पनवेल** : ट्रेडिंगच्या बहाण्याने नोंदणी करून १० लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात २६ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्यामसुंदर सारंगपाणी खारघर, सेक्टर ३४ ए येथे राहत असून १३ ऑगस्ट ते २० ऑगस्टदरम्यान आरोपींनी जी फाय वेल्थ नेविगेटर या व्हॉट्सअप ग्रुपमध्ये त्यांना जॉईन केले आणि फाईव्ह पैसा कॅपिटल लिमिटेडचे बनावट प्रतिनिधी भासवले तसेच सेबीचे बनावट प्रमाणपत्र त्यांना दाखवून बनावट वेबसाईटवर ट्रेडिंगच्या बहाण्याने नोंदणी करण्यास भाग पाडले. फिर्यादीच्या बँक खात्यातून त्यांच्या बँक खात्यात १० लाख रुपये घेतले. दरम्यान, पैसे काढण्याची मागणी केली असता विड्रॉल ब्लॉक करून आणखी २३ लाख ३८ हजारांची मागणी केली. अखेर या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तत्काळ खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'सीकेटी'त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात; मेजर ध्यानचंद यांच्या योगदानाचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतात दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. हा दिवस भारताचे महान हॉकीपटू हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या स्मृतीस व योगदानास आदरांजली वाहण्यासाठी साजरा केला जातो. मेजर ध्यानचंद यांच्या उल्लेखनीय योगदानाचा आणि कर्तृत्वाचा गौरव करणारा कार्यक्रम सीकेटी विद्यालय, इंग्रजी माध्यमिक विभागात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या दिवसाचे निमित्त साधून विद्यालयातील विविध क्रीडा साहित्य विद्यार्थ्यांसाठी पाहण्यासाठी ठेवण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची इसे यांनी केले. मुख्याध्यापिका स्वाती काळे आणि क्रीडा विभागप्रमुख अशोक पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. इयत्ता आठवी ब आणि क मधील विद्यार्थ्यांनी आरंभ है प्रचंड, हे स्फूर्तिगीत सादर केले. मनीषा पाटील यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रेरणादायी जीवनावर आणि कर्तृत्वावर माहितीपूर्ण भाषण केले.

मुख्याध्यापिका स्वाती काळे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त खेळाडू कसे असावेत आणि भविष्यात आपल्यातील मूळ खिलाडूवृत्ती कशी जागृत ठेवावी, हे सांगत असतानाच त्यांनी भारतातील दिग्गज खेळाडूंचा आदर्श एका घटनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सांगितला. शुभश्री चटर्जी, वेद महाबळे या आठवीच्या आणि इयत्ता नववीची विद्यार्थिनी काव्या पवार यांनीही आपले विचार भाषणातून व्यक्त केले.

हा कार्यक्रम ग्रीन हाऊसच्या शिक्षकांच्या प्रगती जाधव, प्राची इसे, मनीषा पाटील, स्नेहा पाटील, रुचिता घोलप, महेश पोपेटा यांच्या अथक प्रयत्नांतून सादर करण्यात आला. आठवी क मधील विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

# कामोठ्यातील सर्व रस्त्यांचे कॉँक्रीटीकरण करावे

## नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांची आयुक्त, महापौरांकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ११, १२, १३ मधील कामोठे परिसरातील अनेक रस्ते मागील अनेक दिवसांपासून खराब झाले असून नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. वारंवार पडणाऱ्या खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला असून रस्त्याची सातत्याने दुरुस्ती करावी लागत असल्याने महापालिकेचा वेळ आणि पैसा वाया जात आहे. या पार्श्वभूमीवर या भागातील सर्व रस्त्यांचे एकदाच कायमस्वरूपी कॉँक्रिटीकरण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी केली आहे.

याबाबत नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी नुकतेच पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे आणि महापौर नितीन पाटील यांना स्वतंत्र पत्रे दिली आहेत. या पत्रात त्यांनी कामोठ्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधले असून कॉँक्रिटीकरणाच्या कामाला प्राधान्यक्रमाने सुरुवात करण्याची मागणी केली आहे.

पहिल्या टप्प्यात मानसरोवर रेल्वे स्टेशन ते मुंबई-पुणे हायवे, दुसऱ्या टप्प्यात मानसरोवर रेल्वे स्टेशन ते खांदेश्वर रेल्वे स्टेशन, तिसऱ्या टप्प्यात एल. जी. शोरूम सेक्टर ७ ते सेंट्रल बँक ऑफ इंडिया सेक्टर २० या मुख्य रस्त्यांचे व त्यानंतर अंतर्गत रस्त्यांचे कॉँक्रिटीकरण करण्यात यावे, असे पत्रात नमूद केले आहे.

# रामशेठ ठाकूर कॉलेजकडून कांदळवन स्वच्छता

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रविवारी (दि. ३०) सकाळी साडेसात वाजता पाम बीच मार्गावरील समुद्रेश्वर मंदिर परिसरात कांदळवन स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सक्रिय सहभाग नोंदविला.

स्वच्छता अभियानाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कांदळवन संवर्धन, पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे जतन आणि कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती निर्माण करणे हा होता. स्वयंसेवकांनी परिसरातील प्लास्टिक, कचरा तसेच इतर टाकाऊ वस्तू गोळा करून परिसराची स्वच्छता केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी प्रत्यक्ष कृती करण्याचा आदर्श समाजासमोर ठेवला. कांदळवने ही समुद्रकिनारी परिसंस्थेतील अत्यंत महत्त्वाची नैसर्गिक संपत्ती असून ती समुद्रकिनाऱ्याचे संरक्षण करण्याबरोबरच विविध जलचर, पक्षी आणि इतर सजीवांना नैसर्गिक अधिवास



उपलब्ध करून देतात.

त्यामुळे कांदळवनांचे संरक्षण व संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक व पर्यावरणीय जबाबदारी आहे, हा संदेश या अभियानातून देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सामाजिक बांधिलकी, स्वच्छतेची सवय आणि शाश्वत विकासाची भावना दृढ झाली. विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे श्रमदान करून परिसर स्वच्छ ठेवण्याचा तसेच भविष्यातही पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प केला.

अभियानाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना समितीचे सदस्य आणि सर्व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून अभियान यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. उपक्रमातून स्वच्छ कांदळवने, हरित भविष्य, हा पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

## संपादकीय

# एकात्मतेचा संदेश

सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी अमेरिकेतील 'युनिव्हर्सल वननेस सेलिब्रेशन'मध्ये मांडलेला विचार हा केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या एका संघटनेचा संदेश नसून भारतीय संस्कृतीच्या मूलभूत चिंतनाचे या कार्यक्रमाच्या निमित्ताने जागतिक व्यासपीठावर प्रभावी प्रकटीकरण झाले आहे.

**अमेरिका म्हटले की आपल्याला बहुविधता आठवते आणि भारत म्हटले की विविधतेतील एकता हे शब्द आठवतात. भारताच्या बाबतीत एकता आणि विविधता हे दोन्ही त्याच्या 'डीएनए'मध्येच आहेत असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी न्यूयॉर्कमधील मॅडिसन स्क्वेअर गार्डन येथे झालेल्या 'युनिव्हर्सल वननेस सेलिब्रेशन' या भव्य कार्यक्रमात केले. अमेरिकेतील ३९ राज्ये, ८५० शहरे आणि २९ देशांतील सुमारे सहा हजार प्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात ३० देशांतील सुमारे १८० धार्मिक नेत्यांनीही सहभाग घेतला. आपण सारे एकात्मतेने जोडलेले आहोत आणि विविधतेमुळे ही एकात्मता अधिक सुंदर बनते. विविधता ही नैसर्गिक आहे आणि एकता हे सत्य आहे. विविधतेचा स्वीकार, सन्मान आणि संरक्षण हेच खऱ्या एकतेचे लक्षण असल्याची आग्रही मांडणी सरसंघचालकांनी यावेळी केली. त्यांच्या या विचाराला जागतिक धार्मिक नेत्यांनी दिलेली कृतीची जोड महत्त्वाची आहे. 'एक विश्व : एक मानवता' या संकल्पनेअंतर्गत धर्माचा आधार घेऊन द्वेष, अपमान किंवा हिंसेचे समर्थन न करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. परस्पर संवाद वाढवणे, एकत्र सेवा करणे आणि भविष्यासाठी जबाबदारी स्वीकारणे असा कृती कार्यक्रमही मांडण्यात आला. विशेष म्हणजे वेगवेगळ्या धर्मांच्या प्रतिनिधींनी एकमेकांना राखी बांधून बंधुभावाचे प्रतीकही साकारले. भागवत यांनी धर्माची व्याख्याही संकुचित धार्मिक ओळखीपलीकडे नेली. धर्माचा अंतिम उद्देश सत्यापर्यंत पोहोचणे हा आहे असे त्यांनी सांगितले. सर्व मार्ग एकाच सत्याकडे नेतात हा भारतीय विचार त्यांनी समोर ठेवला. त्यासंदर्भात बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की एखाद्या हिंदूला भारतात एकही मुस्लिम असू नये असे वाटत असेल तर तो कदाचित हिंदूच नसेल. धार्मिक सहअस्तित्व आणि परस्पर सन्मान हा भारतीय विचारपद्धतीचा अविभाज्य भाग असल्याचे त्यांच्या विवेचनातून अधोरेखित झाले. त्यांच्या या भूमिकेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही एकप्रकारे समर्थनच केले आहे. हिंदुत्वाचा आत्मा सहिष्णुता आहे. भारताने आक्रमणांचा सामना करूनही विविध समाजघटकांना सामावून घेतले. यामागे भारतीय संस्कृतीची सहिष्णू वृत्तीच असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र हिंदूंना धार्मिक सहिष्णुता शिकवण्याचा प्रयत्न कुणी करू नये. सहिष्णुता हिंदूंच्या रक्तात आहे असेही फडणवीस म्हणाले. संघाच्या कार्याबाबत गैरसमज असल्याचेही भागवत यांनी कार्यक्रमात नमूद केले. संघाचे कार्य प्रत्यक्ष अनुभवले आणि संघाशी संवाद साधला तरच त्याची नीट ओळख होईल असेही ते म्हणाले. संघाच्या शताब्दी वर्षात जगाशी संवाद साधण्याचा हा प्रयत्न म्हणजे प्रतिमानिर्मिती नसून विचार स्पष्ट करण्याचा प्रयत्न म्हटला पाहिजे. 'वसुधैव कुटुंबकम्' ही घोषणा म्हणून नव्हे तर जीवनपद्धती म्हणून स्वीकारण्याची वेळ आली आहे. मतभेद असतील, श्रद्धा वेगळ्या असतील, संस्कृती वेगवेगळ्या असतील, पण माणुसकीची प्रतिष्ठा समान असेल तर विविधतेतून संघर्ष नव्हे तर सहअस्तित्व जन्म घेऊ शकते. भागवतांचा संदेश या संपूर्ण कार्यक्रमाचा गाभा आहे. हाच भारतीय विचार जगासमोर आत्मविश्वासाने मांडण्याचे काम या कार्यक्रमाने केले आहे.**

# गणेशोत्सव...परंपरेचा, आपुलकीचा, नव्या जाणिवांचा उत्सव

सिंधुदुर्ग म्हटलं की डोळ्यांसमोर येतो तो निळाशार समुद्र, हिरवीगार डोंगररांग, लाल मातीची वाट, कौलारू घरे, अंगणातली तुळस आणि माणसांच्या मनात जपलेली आपुलकी. या भूमीच्या सांस्कृतिक जीवनात अनेक सण–उत्सवांना विशेष स्थान आहे; मात्र गणेशोत्सवाची गोष्ट काही वेगळीच आहे. कारण इथे गणपती म्हणजे केवळ देवघरात विराजमान होणारी मूर्ती नाही, तर घराला पुन्हा घरपण देणारा, माणसांना पुन्हा एकत्र आणणारा आणि गावाला पुन्हा जिवंत करणारा उत्सव आहे.

श्रावण सुरू झाला की कोकणात गणेशोत्सवाची चाहूल लागते. घरांची साफसफाई सुरू होते, मखराची तयारी होते, अंगण सजते, बाजारपेठा गजबजतात आणि दूरवर नोकरी–व्यवसायासाठी गेलेल्या माणसांच्या परतीची वाट पाहिली जाते. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई किंवा राज्याच्या इतर भागांत राहणारा कोकणवासी गणपतीसाठी आपल्या गावच्या घराकडे परततो. वर्षभर दूर असलेली भावंडे, नातेवाईक, मित्रमंडळी पुन्हा एकत्र येतात. सिंधुदुर्गाच्या गणेशोत्सवाचे हेच कदाचित सर्वांत मोठे वैशिष्ट्य आहेबाप्पा येतो आणि माणसं जवळ येतात.



सिंधुदुर्गातील गणेशोत्सव हा म्हणूनच श्रद्धेबरोबरच कुटुंब, गाव आणि परंपरेचा उत्सव आहे. जिल्ह्यातील सांस्कृतिक परंपरांमध्ये गणेशचतुर्थीला महत्त्वाचे स्थान असून भजन, फुगड्या आणि विविध लोककला या उत्सवाशी जोडलेल्या आहेत. गावागावांत गणेशोत्सवाच्या काळात वातावरण भक्तिमय करणाऱ्या भजनांच्या तालमी आधीपासून सुरू होतात. अभंग, गौळणी, गजर आणि पारंपरिक वाद्यांचा नाद उत्सवाला वेगळीच रंगत देतो.

या परंपरेत आपल्या मातीचा सुगंध आहे. घरगुती गणपती, गौरीचे आगमन, आरती, नैवेद्य, मोदक, भजन, फुगड्या, नातेवाईकांच्या भेटीगाठी, लहान मुलांचा उत्साह, आजी–आजोबांच्या आठवणी आणि गावच्या मंडळींचे सामूहिक नियोजनया सगळ्यांनी मिळून सिंधुदुर्गाचा गणेशोत्सव आकार घेतो. कुठे घरातील ज्येष्ठ व्यक्ती परंपरा सांगते, कुठे आई किंवा आजी मुलांना नैवेद्याची पद्धत शिकवते, तर कुठे तरुण मंडळी सजावट, आयोजन आणि डिजिटल माध्यमांची जबाबदारी सांभाळतात. अशा प्रकारे प्रत्येक पिढी आपापल्या पद्धतीने उत्सवात सहभागी होते.

राज्य शासनाच्या वतीने आता गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचे स्वरूप देण्यात आले असून त्यानिमित्त विविध सांस्कृतिक, सामाजिक, पर्यावरणपूरक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्याची संकल्पना पुढे आली आहे. उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, गणेशोत्सवाशी संबंधित रील्स व डिजिटल उपक्रम, प्रमुख गणेशस्थळांचे ऑनलाइन दर्शन आणि विविध क्षेत्रांतील स्थानिक सहभागाला प्रोत्साहन देण्याची दिशा निश्चित करण्यात आली आहे. या सगळ्या उपक्रमांचा अर्थ उत्सव मोठा, भव्य किंवा खर्चिक करणे एवढाच नाही. उलट, आपली परंपरा जपत उत्सव अधिक अर्थपूर्ण कसा करता येईल, हा त्यामागचा खरा विचार आहे.

गणेशोत्सव मंडळांनी यंदा आपल्या परिसरातील पारंपरिक कला आणि स्थानिक संस्कृतीला सजावटीचा आणि कार्यक्रमांचा केंद्रबिंदू बनवावे. सिंधुदुर्गची दशावतार लोककला, स्थानिक हस्तकला, पारंपरिक वाद्ये, कोकणी–मालवणी संस्कृती, गावचा इतिहास, स्थानिक देवस्थाने, किल्ले, लोकपरंपरा अशा विषयांवर देखावे, प्रदर्शन, कथाकथन किंवा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येतील. सिंधुदुर्गच्या सांस्कृतिक ओळखीत दशावताराबरोबर चित्रकथी, गंजिफा, कोळीनृत्य आणि विविध ग्रामपरंपरांना महत्त्व आहे.

मुलांसाठी गणपती म्हणजे आनंदाचा सण. त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारा उत्सव घडविणे ही मोठ्यांची जबाबदारी आहे. शाडू मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळा, गणेशोत्सवावरील चित्रकला, निबंध, वक्तृत्व, कथाकथन, पारंपरिक खेळ, प्रश्नमंजुषा किंवा स्थानिक इतिहासावर आधारित उपक्रम घेता येतील. तरुणांसाठी डिजिटल डिझाइन, रील्स, छायाचित्रण आणि माहितीपट निर्मितीच्या संधी उपलब्ध करून देता येतील. ज्येष्ठ नागरिकांकडून गावच्या गणेशोत्सवाच्या जुन्या आठवणी ऐकून त्या नव्या पिढीपर्यंत पोहोचविता येतील. गणेशोत्सव म्हणजे फक्त मनोरंजन नव्हे; तो पिढ्यांना जोडणारा सांस्कृतिक दुवा आहे.

यंदा या दुव्याला पर्यावरणाची जोड देऊया. बाप्पाच्या स्वागतासाठी शाडू मातीची किंवा पर्यावरणपूरक मूर्ती निवडणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, नैसर्गिक साहित्याने सजावट करणे, निर्माल्य वेगळे संकलित करणे आणि शक्य तिथे पर्यावरणपूरक विसर्जनाची व्यवस्था करणे, हे प्रत्येक घर आणि मंडळाला सहज शक्य आहे. फुले, पाने, नारळाच्या झावळ्या, बांबू, कापड, कागद, माती आणि स्थानिक उपलब्ध साहित्य वापरून केलेली सजावट ही दिसायलाही सुंदर असते आणि आपल्या मातीतल्या परंपरेशीही जोडलेली असते.

विसर्जन हा भावनेचा क्षण आहे. त्यामुळे तो तितक्याच जबाबदारीने साजरा करणे गरजेचे आहे. जलस्रोत स्वच्छ राहावेत, पाण्याला आणि निसर्गाला हानी पोहोचू नये, निर्माल्य पाण्यात न टाकता स्वतंत्रपणे संकलित करावे, याची काळजी घेऊया. आवश्यक त्या ठिकाणी कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर करणे, हा देखील पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, निर्माल्य संकलन, पुनर्वापर आणि प्लास्टिकमुक्त उत्सवासाठी व्यापक जनजागृती करण्याची दिशा यंदाच्या उपक्रमांमध्येही अधोरेखित करण्यात आली आहे.

ऊर्जेची बचत हा देखील उत्सवाचा एक सुंदर संकल्प होऊ शकतो. सजावटीसाठी दिवसभर अनावश्यक विद्युत रोषणाई ठेवण्याऐवजी गरजेपुरतीच रोषणाई, एलईडी दिव्यांचा वापर, शक्य असल्यास सौरऊर्जेवर आधारित सजावट आणि वेळेचे नियोजन यामुळे उत्सवाचा आनंद कमी होत नाही; उलट जबाबदार उत्सवाची नवी ओळख निर्माण होते. ऊर्जा बचतीचा संदेश देणारा गणेशोत्सव ही पुढच्या पिढीसाठीची चांगली शिकवण ठरेल.

उत्सव समाजाला जोडण्यासाठी असतो. म्हणून मंडळांच्या कार्यक्रमांत स्थानिक बचत गट, कारागीर, कलाकार, शेतकरी, लघुउद्योजक व स्थानिक उत्पादनांना स्थान देता येईल. गणेशमूर्ती, मखर, सजावट, पूजासाहित्य, पारंपरिक खाद्यपदार्थ, हस्तकला किंवा स्थानिक कलाकृतींना प्रोत्साहन दिल्यास उत्सवाचा आनंद गावच्या अर्थव्यवस्थेलाही हातभार लावू शकतो. महिलांच्या बचत गटांना स्थानिक खाद्यपदार्थ किंवा प्रसादाच्या उपक्रमात सहभागी करून घेता येईल. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देणे म्हणजे आपल्या संस्कृतीला पुढे नेणे होय.

आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे उत्सवातील प्रत्येकाचा सहभाग. एखाद्या मंडळाचा उत्सव केवळ काही कार्यकर्त्यांचा न राहता तो संपूर्ण परिसराचा उत्सव व्हावा. ज्येष्ठांसाठी सांस्कृतिक मैफल, महिलांसाठी पारंपरिक खेळ किंवा कौशल्य प्रदर्शन, मुलांसाठी सर्जनशील उपक्रम, तरुणांसाठी क्रीडा व डिजिटल स्पर्धा आणि सर्वांसाठी सामूहिक आरती, भजन किंवा सांस्कृतिक कार्यक्रम असे विविध उपक्रम उत्सवाला सर्वसमावेशक बनवू शकतात. सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, सुरक्षितता आणि गरजूंसाठी मदत अशा छोट्या उपक्रमांमधून उत्सवाचे सामाजिक रूप अधिक सुंदर करता येईल.

यंदा उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांच्या स्पर्धेतही मोठ्या उत्साहाने सहभागी होऊया. ही स्पर्धा केवळ सजावट किंवा देखाव्याची नसून उत्सव कसा साजरा केला, परंपरा किती जपली, समाजाचा सहभाग किती वाढविला, पर्यावरणाची काळजी किती घेतली आणि उपक्रमांमधून किती सकारात्मक संदेश दिला, याचेही एक सुंदर व्यासपीठ बनू शकते. आजच्या डिजिटल युगात आपल्या गावचा गणपती जगभर पोहोचविण्याची संधीही प्रत्येकाच्या हातात आहे.


**–सचिन अडसूळ,**
**जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग**



## बदलते तंत्रज्ञान

# लॅपटॉपच्या स्क्रीनवरची धूळ अशी करा साफ...

लॅपटॉप हा आपल्या रोजच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. कामाच्या निमित्ताने आपण रोज लॅपटॉप उघड–बंद करतो. अनेकदा लॅपटॉप उघडला की त्यावर भरपूर धूळ बसलेली दिसते. अशावेळी आपण टिश्यू पेपर अथवा एखादा कपडा घेऊन लॅपटॉपची स्क्रीन पुसू लागतो, मात्र असं करणं चूक आहे. लॅपटॉपची स्क्रीन अत्यंत नाजूक असल्यामुळे, तिची साफसफाई करताना कठोर रसायने किंवा जास्त दाब वापरल्यास तिचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे, तुमचा लॅपटॉप पुन्हा लखलखीत दिसावा यासाठी तो साफ करताना काही गोष्टी जाणून घेणे गरजेचे आहे.



लॅपटॉपच्या स्क्रीनची साफसफाई सुरू करण्यापूर्वी दोन गोष्टींकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. सर्वप्रथम लॅपटॉपला पॉवर सोर्समधून काढा आणि तो पूर्णपणे बंद करा. जर लॅपटॉप नुकताच वापरून बंद केला असेल आणि गरम असेल, तर त्याला पूर्ण थंड होऊ द्या. गरम स्क्रीन पुसल्यास ती खराब होण्याची शक्यता जास्त असते.

तुमच्या लॅपटॉपवर असलेल्या डागांनुसार तुम्ही योग्य साधने वापरू शकता. स्क्रीनवरील सामान्य धूळ आणि हलके डाग काढण्यासाठी मायक्रोफायबर कापडाचा वापर करा. हे कापड अत्यंत मऊ असल्याने स्क्रीनवर ओरखडे पडत नाहीत.

जर स्क्रीनवर काही चिकट आणि जुने डाग असतील, तर मायक्रोफायबर कापडावर थोडे डिस्टिल्ड वॉटर घेऊन हळूवारपणे पुसा. साधे नळाचे पाणी वापरणे टाळा, कारण त्यात क्षार असू शकतात. याव्यतिरिक्त कॉर्नर आणि कडांना अडकलेली धूळ काढण्यासाठी एअर कॉम्प्रेसरचा काळजीपूर्वक वापर करा. लॅपटॉपसाठी बनवलेल्या क्लिनिंग वाइप्सचा पर्यायदेखील निवडू शकता. साफसफाई पूर्ण झाल्यावर, लॅपटॉप पुन्हा सुरू करण्यापूर्वी स्क्रीन पूर्णपणे कोरडी झाली आहे, याची खात्री करा.

लॅपटॉप स्क्रीन नाजूक असल्याने काही वस्तू वापरणे कटाक्षाने टाळले पाहिजे. पेपर टॉवेल किंवा टिश्यू पेपर वापरू नका, कारण त्यांचे तंतू स्क्रीनवर बारीक ओरखडे पाडू शकतात तसेच अल्कोहोल किंवा अमोनिया आधारित क्लीनर वापरणे टाळा. हे कठोर रसायन स्क्रीनवरील संरक्षक थर काढून टाकू शकतात. याशिवाय, क्लीनिंग लिक्विड कधीही थेट स्क्रीनवर स्प्रे करू नका. हे द्रव कडांमधून आत जाऊन अंतर्गत सर्किट्स बिघडवू शकते, ज्यामुळे लॅपटॉपचे मोठे नुकसान होते.

# भारत गायन समाज संस्थेची स्थापना

## निमित्त




हिंदुस्थानी संगीताच्या प्रसार–प्रचारार्थ आणि संगीतप्रशिक्षण यासाठी कार्यरत असलेली एक जुनी संगीतसंस्था म्हणून भारत गायन समाज संस्था ओळखली जाते. गायनाचार्य भास्करबुवा बखले यांनी जिज्ञासूंना सहज संगीत शिकता यावे या हेतूने १ सप्टेंबर १९११ रोजी या संस्थेची स्थापन केली. किर्लोस्कर संगीत नाटक मंडळींचा या संस्थेस पाठिंबा असल्याने संस्थेचे नामकरण 'किर्लोस्कर भारत गायन समाज' करण्यात आले. कालांतराने ते 'भारत गायन समाज' असे झाले. भास्करबुवांच्या निधनानंतर (१९२२) दत्तोपंत बागलकोटकर, बापूराव केतकर, शंकरराव अष्टेकर, गोविंदराव टेंबे, बालगंधर्व, ताराबाई शिरोडकर, मास्तर कृष्णराव प्रभृतींनी व त्यांच्या शिष्यांनी हे कार्य नेटाने पुढे चालू ठेवले.

संस्थेने १९२८मध्ये पुण्यात शनिवार, शुक्रवार पेठ येथे वास्तू खरेदी केली. 'भास्कर संगीत विद्यालय' ही शिक्षण शाखा १९४५ साली येथे सुरू झाली. मास्तर कृष्णराव यांनी या संस्थेचा दहा वर्षांचा अभ्यासक्रम तयार केला. पुढे पुण्यातील एक जुनी संस्था 'पुणे गायन समाज' आणि 'भारत गायन समाज' या संस्थांचे विलीनीकरण होऊन १९४१मध्ये 'पुणे भारत गायन समाज' ही संस्था अस्तित्वात आली.

संस्थेच्या भास्कर संगीत विद्यालयामध्ये हिंदुस्थानी अभिजात संगीत तसेच हार्मोनियम, तबला, व्हायोलिन, सतार ही वाद्ये आणि भरतनाट्यम् व कथ्थक या नृत्यप्रकारांचे शिक्षण दिले जाते. दरवर्षी अभ्यासक्रमानुसार एप्रिल आणि डिसेंबर या महिन्यांत परीक्षा घेतल्या जातात. दहा वर्षांच्या या अभ्यासक्रमामध्ये तीन वर्षांनंतर संगीत मध्यमा, पाचव्या वर्षी संगीत कुशल, सातव्या वर्षी संगीत विशारद आणि दहाव्या वर्षी संगीत पारंगत ही प्रमाणपत्रे दिली जातात. संस्थेच्या अभ्यासक्रमास १९६२मध्ये राज्य शासनाकडून मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे इतरही संलग्न संगीत महाविद्यालयांमध्ये हा अभ्यासक्रम शिकविला जातो.

भास्कर संगीत विद्यालयाने संगीत अभ्यासकांकरिता भास्कर संगीत प्रवेशिका, राग संग्रह (खंड १ ते ३), हार्मोनियम प्रवेश (खंड १ ते ३), तबलावादन प्रवेश (खंड १ व २), ताल साधना (खंड १ व २) आणि तालविज्ञान या पुस्तकांची निर्मिती केली आहे. संस्थेमध्ये संगीतविषयक अनेक पुस्तकांचे सुसज्ज ग्रंथालय आहे तसेच जुन्या पिढीतील अनेक ख्यातकीर्त संगीत कलाकारांच्या ध्वनिमुद्रिकांचे जतन करण्यात आलेले आहे. भास्करबुवांच्या १३१व्या जयंतीनिमित्त टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे ऑक्टोबर २०००मध्ये भव्य समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास भीमसेन जोशी, नौशाद अली इत्यादी मान्यवरांच्या हस्ते प्रतिष्ठित पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. याचवर्षी पं. भास्करबुवा यांनी रचलेल्या गाण्यांसह संगीत स्वयंवर या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला.

संस्थेतर्फे हिंदुस्थानी अभिजात संगीताबरोबरच प्रामुख्याने नाट्यसंगीतही तरुण गायकांवर बिंबवणे आणि नाट्यसंगीत पुढच्या पिढीपर्यंत पोहचावे या उद्देशाने १९६८पासून बालगंधर्व नाट्यसंगीत स्पर्धा भरविली जाते. भास्करबुवांच्या तिसऱ्या आणि चौथ्या पिढीतील आप्तमंडळींनी संस्थेची परंपरा नेटाने पुढे सुरू ठेवली आहे.

**–सु.र. देशपांडे (मराठी विश्वकोष)**


## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## लिव्हर खराब झाले, तर हातांवर दिसतात 'ही' लक्षणे

हातांच्या तळव्यावर विशेषतः अंगठा आणि करंगळीच्या खाली जर लालसरपणा दिसत असेल, तर तो यकृताच्या कार्यातील बिघाडाचं संकेत असू शकतो. यकृताच्या आजारात शरीरात एस्ट्रोजेन हार्मोनचं प्रमाण वाढतं, ज्यामुळे रक्तवाहिन्या फुगतात आणि तळवे लाल दिसतात. हे लक्षण कधी कधी निरोगी व्यक्तींमध्येही आढळू शकतं, तरी वारंवार दिसल्यास वैद्यकीय सल्ला घेणं गरजेचं आहे.



हात वाकडे होणं – या स्थितीत तळहाताखालील त्वचा जाडसर आणि आकुंचन पावते, ज्यामुळे बोटं हळूहळू वाकलेली राहतात.हे लक्षण दीर्घकाळ यकृताशी संबंधित आजारांमध्ये विशेषतः सिरोसिस मध्ये दिसू शकतं. अल्कोहोलचे सेवन, मधुमेह आणि आनुवंशिक कारणेदेखील यास कारणीभूत ठरू शकतात.

'टेरी नेल्स'– नखांच्या टोकाला जर पांढुरका रंग आणि बेसला फक्त गुलाबी पट्टा दिसत असेल, तर यकृतातील प्रथिनांची आणि रक्तप्रवाहातील असंतुलनाची शक्यता असते. ही स्थिती सिरोसिस, हृदयविकार किंवा मधुमेहामध्येही दिसू शकते. अशा वेळी नखे केवळ सौंदर्याचा आरसा नसतात, तर ते शरीरातील गंभीर बदलांचं प्रतिबिंब असतात.

नखांचा आकार बदलणे– बोटांच्या टोकांना गोलाई येणं आणि नखं जाडसर दिसणं हे ऑक्सिजनच्या कमतरतेचं आणि यकृताच्या कार्यात बिघाडाचं संकेत ठरू शकतं. हे लक्षण फुप्फुस, हृदय आणि यकृताच्या दीर्घकालीन आजारांमध्ये आढळतं, त्यामुळे हे बदल दिसल्यास तपासणी आवश्यक आहे.

हातांची थरथर –कधी कधी हात आणि मनगट अनियंत्रितपणे थरथरतात–ही लक्षणं गंभीर यकृत स्थितीत दिसतात, जेव्हा शरीरातील विषारी द्रव्ये मेंदूपर्यंत पोहोचतात.

हातापायांना खाज सुटणं– जर हातांच्या तळव्यांना आणि पायांच्या तळांना अचानक, सतत खाज सुटत असेल आणि कोणतेही पुरळ दिसत नसेल, तर तेही यकृतातील पित्तप्रवाह अडकल्याचं संकेत असू शकतं. दरम्यान, ही स्थिती Cirrhosis मध्ये सामान्य आहे आणि रात्री विशेषतः वाढते. ही लक्षणं तात्पुरतीदेखील असू शकतात, पण दुर्लक्ष केल्यास मोठ्या आजाराचं रूप घेऊ शकतात.

# आदिवासी नागरिकांची बँक खाती उघडून साडेतीन कोटींची सायबर फसवणूक

**पेण : प्रतिनिधी**

बँक खात्यांचा गैरवापर करून नागरिकांची मोठ्या प्रमाणात सायबर फसवणूक केल्याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार मयूर विलास म्हात्रे (वय २५, रा. उंबर्डे, ता. पेण) याच्यासह अन्य आरोपींच्या भूमिकेचा पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

पेण पोलीस ठाण्यात शासनातर्फे फिर्यादी पोहेकॉ सागर खांडसकर यांच्या तक्रारीवरून दिनांक २६ ऑगस्ट २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, मयूर म्हात्रे याने सर्वप्रथम सागर पांडुरंग वाघमारे व वामन नागू गडखळ यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व आदिवासी समाजातील नागरिकांची बँक खाती उघडून घेण्यात आली. सदर खाती सायबर फसवणुकीतून प्राप्त होणारी रक्कम स्वीकारण्यासाठी वापरण्यात आल्याचा पोलिसांचा संशय असून या संपूर्ण व्यवहारामागे सुनियोजित आर्थिक साखळी कार्यरत असल्याचे तपासात पुढे आले आहे.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपींनी संबंधित नागरिकांकडून आवश्यक कागदपत्रे प्राप्त करून त्यांच्या नावाने बँक खाती उघडण्याची कार्यवाही केली. त्यानंतर या खात्यांचा प्रत्यक्ष वापर करून सायबर फसवणुकीतून प्राप्त झालेली रक्कम विविध बँक खात्यांमध्ये जमा व हस्तांतरित करण्यात आली.



या प्रकरणात आतापर्यंत रु. ३ कोटी ४६ लाख ४६ हजार ९२२/- इतक्या रकमेची आर्थिक उलाढाल आढळून आली असून, सदर रक्कम विविध बँक खात्यांमध्ये वर्ग करून सायबर फसवणुकीची आर्थिक साखळी निर्माण करण्यात आल्याचे तपासातून समोर येत आहे. या आर्थिक व्यवहारांचा तसेच संबंधित बँक खात्यांचा पोलिसांकडून सखोल तपास करण्यात येत आहे.

## सूत्रधार मयूर म्हात्रे जाळ्यात

दरम्यान, मयूर विलास म्हात्रे यास सायबर पोलीस ठाणे, अलिबाग येथे दाखल गुन्हा क्र. ०४/२०२६ मध्ये यापूर्वीच दिनांक २४ जुलै २०२६ रोजी अटक करण्यात आली असून, मा. न्यायालयाच्या आदेशानुसार तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. सदर आरोपीचा या गुन्ह्यातील सहभाग, त्याचे इतर आरोपींशी असलेले संपर्क, विविध बँक खात्यांमधील आर्थिक व्यवहार तसेच सायबर फसवणुकीच्या रकमेचा अंतिम प्रवाह याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विक्रम नवरखेडे करीत आहेत. सायबर फसवणुकीत वापरण्यात आलेली बँक खाती, आर्थिक व्यवहार, संबंधित व्यक्तींचे परस्पर संबंध आणि फसवणुकीच्या रकमेचा पुढील प्रवास याबाबत पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे. बँक खाते कोणत्याही व्यक्तीस वापरण्यासाठी देऊ नये तसेच अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून बँक खात्याशी संबंधित कागदपत्रे अथवा आर्थिक व्यवहार करू नयेत, असे आवाहन पोलिसांकडून नागरिकांना करण्यात आले आहे.

# संकष्ट चतुर्थीला श्रावणी सोमवारी पालीत बल्लाळेश्वराच्या चरणी भाविक नतमस्तक

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या पाली नगरीत संकष्टी चतुर्थीनिमित्त भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. सोमवारी (३१ ऑगस्ट) श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक मोठ्या संख्येने पालीत दाखल झाले. पहाटेपासूनच मंदिर परिसरात दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण बल्लाळनगरी दुमदुमून गेली.

संकष्टी चतुर्थी आणि श्रावणी एकत्र आल्याने पालीत भाविकांची मोठी गर्दी झाली. जिल्ह्यातील विविध भागांतून भाविकांच्या पायी दिंड्याही पालीत दाखल झाल्या. दिवसभर



मंदिर परिसर तसेच पालीतील प्रमुख रस्त्यांवर भाविक आणि वाहनांची मोठी रेलचेल पाहायला मिळाली.

संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री बल्लाळेश्वराला आकर्षक वस्त्र व आभूषणांनी सजवण्यात आले होते. मंदिर परिसरात सुंदर रांगोळीही काढण्यात आली होती. सजलेले मंदिर, भक्तांची गर्दी आणि जयघोष यामुळे संपूर्ण परिसराला उत्सवाचे स्वरूप आले होते.

पालीत दाखल झालेल्या हजारो भाविकांमुळे स्थानिक बाजारपेठेतही मोठी आर्थिक उलाढाल झाली. हॉटेल, लॉजिंग-बोर्डिंग, पेढे, पापड, लोणची, मिरगुंड, सरबत तसेच छोट्या-मोठ्या दुकानदारांच्या व्यवसायाला चांगलीच चालना मिळाली. मंदिर परिसरातील दुकाने आणि हॉटेल्स दिवसभर ग्राहकांनी गजबजलेली होती.भाविकांच्या गर्दीचा थेट फायदा स्थानिक आदिवासी महिलांनाही झाला. अनेक आदिवासी महिला गावठी भाज्या, कंदमुळे आणि अन्य स्थानिक वस्तू विक्रीसाठी घेऊन बसल्या होत्या. भाविकांनी या वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी केल्याने आदिवासी महिलांना रोजगार आणि उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले.

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन श्री बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. दर्शनाच्या रांगेत शिस्त राहावी यासाठी रेलिंग व शेडची व्यवस्था करण्यात आली होती.

# वरदा सुनील तटकरे संगीत, नृत्य अकॅडमीचे उद्घाटन



**रोहा : प्रतिनिधी**

मुंबई, पुणेच्या तोडीस तोड वरदाई सुनील तटकरे नृत्य अँकॅडमी रोह्यात तटकरे कुटुंबानी उभारली आहे.रोहयातील कलाकारांना मुंबई, पुणे येथे प्रशिक्षणासाठी न जाता ते प्रशिक्षण रोह्यात मिळणार आहे. अँकॅडमीचे दालन सुंदर आहे.येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मला नक्कीच आवडेल असे प्रसिद्ध अभिनेत्री उर्मिला कानेटकर यांनी वरदाई चॅरीटेबल ट्रस्ट रोहा च्या वरदा सुनील तटकरे नृत्य अँकॅडमीचा शुभारंभ प्रसंगी रोह्यातील परमपुज्य पांडुरंगशास्त्री आठवले संकुल येथे व्यक्त केले.

यावेळी आ. अनिकेत तटकरे, वरदाई चॅरीटेबल ट्रस्टच्या वरदा तटकरे, वेदांती तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, गटनेते किसनराव मोरे, जिप सदस्य निधी जाधव, रामचंद्र सकपाळ, नंदकुमार म्हात्रे, निता हजारे, पुर्वा मोहीते, गौरी बारटक्के, प्रियंका धनावडे, संजना शिंदे, एड. मनोजकुमार शिंदे, समिर शेडगे, महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, एड.मयुरा मोरे, विभा चोरगे, प्राजक्ता चव्हाण, माज सवाल, जगन्नाथ धनावडे आदी उपस्थित होते.

यावेळी वरदाई चॅरीटेबल ट्रस्टच्या वरदा तटकरे यांनी उर्मिला कानेटकर या कार्यक्रमास आल्यांने अँकॅडमीचा हुरुप वाढले आहे.या अँकॅडमीतुन कलाकार तयार होऊन चांगले यश संपादन करतील असे सांगितले.

# तळा तालुका शिष्यवृत्ती परीक्षा कार्यशाळा

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुकास्तरीय शिष्यवृत्ती कार्यशाळा डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती तळा येथे शिक्षण विभाग पंचायत समिती तळा यांचे माध्यमातून आयोजित केली होती.यावेळी गटविकास अधिकारी सुनिल गायकवाड, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट ,तज्ञ मार्गदर्शक सुनील बयकर, सुरेश मेस्त्री, केंद्रप्रमुख,शिक्षक,बीआरसी टीम उपस्थित होते.

या शिष्यवृत्ती कार्यशाळेला तज्ञ मार्गदर्शक म्हणून सुनिल बयकर व सुरेश मेस्त्री यांनी काम केले.सदर कार्यशाळेत विद्यार्थी गुणवत्ता वाढविणे, स्पर्धा परीक्षांची ओळख , विद्यार्थ्यांच्या मनातील भिती दूर करणे,परीक्षेचे बदलते स्वरूप व महत्व ,भविष्याचा पाया भक्कम करणे स्वयं अध्ययनाची सवय लावणे, शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल वाढविणे यावरती मार्गदर्शन केले.


## निविदा सूचना

सीलबंद आयटम दर निविदा आहेत नागरी दुरुस्ती. प्लंबिंग, टेरेस वॉटरप्रुफिंग, पेंटींग आणि प्लास्टर. विविध कामांचा १० वर्षाचा अनुभव असलेल्या नामांकित, अनुभवी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम कंत्राटदारांकडून आमंत्रित करीत आहोत.

**पुष्पव्हॅली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत.**
सर्व्हे नं. 175/1, 175/2/A/2, 175/2/B/176
विचूंबे, नवीन पनवेल – 410206.
दूरध्वनी : 8097215199
निविदा : 30/08/2026 ते 10/09/2026
सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत सादर करावयाची आहे.

**सही/-**
**चेअरमन**
पुष्पव्हॅली सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत.
विचूंबे, नवीन पनवेल
(9820109109)



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. २९/२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक १२/०८/२०२६ रोजी दैनिक मुंबई चौफेर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई ,दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील ई-लेआउट जल उदंचन केंद्र व ई-लेआउटमधील एचएसआरची २ वर्षांच्या कालावधीसाठी परिचालनाची सेवा पुरविणे. | ₹ ३७,६६,४४०.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०९/०९/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूसंपादन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे वाटपपत्र/ करारनामा प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटपपत्र/करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनिशी/ वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **नोड-द्रोणागिरी** | | | | |
| १ | द्रोणागिरी २२८९ | चाणजे ४२/८५ | १२६/११ | ०-०६-६ | ४० चौ.मी. | नोड द्रोणागिरी सेक्टर-६५, भूखंड क्र. १५२, क्षेत्र-४० चौ.मी. | **कै. महादेव गंगाराम पाटील (मयत)** वारस दाखला क्र. CMA/२५/२००६ व **कै. आयतुबाई गंगाराम पाटील** वारस दाखला क्र. CMA/९२/२०१८ वारस<br>**१. श्री. रमेश महादेव पाटील**<br>**२. श्री. दिपक महादेव पाटील** | सक्षम न्यायालयाने घोषित केलेले वारस पात्र भूधारक<br>१. श्री. रमेश महादेव पाटील<br>२. श्री. दिपक महादेव पाटील<br>यांच्या नावे भूखंड वाटपाचे प्रस्तावित आहे. |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | **०-०६-६** | | | | |
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| २ | उलवे १८३० | न्हावे २/९४ | अ/४४३ | ०-२९-० | २५० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. B-४२, सेक्टर-१६, क्षेत्र-२४९.९१ चौ.मी. | श्रीमती यमुना दत्तात्रेय भोईर | -- |
| ३ | द्रोणागिरी १००२ | २०८(i) पागोटे | ४०/४<br>५३/११A<br>६५/५A<br>९५/४A१<br>१०१/३<br>१०२/२<br>१३१/५<br>१०१/५A | ०-१४-७<br>०-०४-८<br>०-०७-२<br>०-१७-०<br>०-०३-०<br>०-१५-०<br>०-१०-९<br>०-०१-३ | ६५० चौ.मी. | नोड द्रोणागिरी सेक्टर-५३, भूखंड क्र. २६, क्षेत्र-६४९.९५ चौ.मी. | कै. श्री. अंकुश दामाजी तांडेल (मयत दि.२९.०१.१९९६) यांचे वारस<br>१. श्री. रमेश अंकुश तांडेल<br>२. श्री. जनार्दन अंकुश तांडेल<br>३. श्री. जयराम अंकुश तांडेल<br>४. श्री. राजेश अंकुश तांडेल<br>५. श्रीमती गंगाबाई कमलाकर म्हात्रे<br>६. श्रीमती रुपा दत्ताराम घरत<br>७. सौ. श्रुती हरिदास घरत<br>८. सौ. हौसा गजानन घरत<br>९. सौ. माधुरी सुभाष ठाकुर<br>वारस दाखला : CMA No. ५९/२०१९<br>दिवाणी चौकशी अर्ज क्र. ५९/२०१९ | सक्षम न्यायालयाने घोषित केलेले वारस पात्र भूधारक<br>**१. श्री. रमेश अंकुश तांडेल**<br>**२. श्री. जनार्दन अंकुश तांडेल**<br>**३. श्री. जयराम अंकुश तांडेल**<br>**४. श्री. राजेश अंकुश तांडेल**<br>**५. श्रीमती गंगाबाई कमलाकर म्हात्रे**<br>**६. श्रीमती रुपा दत्ताराम घरत**<br>**७. सौ. श्रुती हरिदास घरत**<br>**८. सौ. हौसा गजानन घरत**<br>**९. सौ. माधुरी सुभाष ठाकुर**<br>यांच्या नावे भूखंड वाटपाचे प्रस्तावित आहे. |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | **०-७३-९** | | | | |
| ४ | द्रोणागिरी ६५३ | नवघर ३६१/ ८५-८६ | २/२<br>२/६<br>२/८<br>२/१०<br>२/११<br>२/१४<br>२/१५<br>५/१३<br>५/१४<br>११/१०<br>१६/१<br>१४/१<br>२७/३<br>४०/१<br>४९/६<br>५३/१०<br>५४/७<br>५५/४<br>५९/५<br>६०/१३<br>६५/२<br>१०७/६<br>१०४/११<br>९८/२<br>१२०/८<br>१२२/३<br>१२५/५<br>१३०/५<br>१३४/१३ब<br>१४४/१३<br>१४६/२<br>१४६/७<br>१४६/११<br>१८०/४<br>१८१/५<br>१८२/४<br>२००/२<br>२०१/७<br>२१२/२<br>२१७/१२<br>२२१/१<br>२२७/६<br>२२८/२<br>२३४/३<br>२७७/६<br>२९४/४<br>२९४/७<br>२९४/८<br>२९५/१<br>२९५/४<br>२९५/७<br>२९७/१<br>२९७/११<br>२९८/१अ<br>२९८/१ब<br>२९८/४<br>२९८/८<br>२९८/९<br>२९९/२<br>२९९/५<br>२९९/७<br>२९९/१०<br>२९९/१२<br>१३४/१अ | ०-१२-१<br>०-०९-०<br>०-१५-३<br>०-१०-०<br>०-०५-०<br>०-१३-४<br>०-१३-६<br>०-०८-७<br>०-०८-७<br>०-०३-८<br>०-०६-३<br>०-०३-८<br>०-०३-३<br>०-२९-०<br>०-०७-३<br>०-०१-०<br>०-०२-५<br>०-०१-८<br>०-००-२<br>०-०२-०<br>०-०३-५<br>०-०३-५<br>०-०२-८<br>०-०१-५<br>०-०२-०<br>०-१७-५<br>०-०७-८<br>०-०६-६<br>०-०६-०<br>०-०३-५<br>०-०४-३<br>०-०१-८<br>०-०२-०<br>०-०५-८<br>०-११-८<br>०-१३-४<br>०-१४-४<br>०-१४-७<br>०-१५-८<br>०-०५-३<br>०-१८-०<br>०-१०-०<br>०-०६-७<br>०-१२-५<br>०-०२-५<br>०-०४-०<br>०-०२-९<br>०-११-०<br>०-१२-०<br>०-०४-८<br>०-०५-९<br>०-२२-०<br>०-०२-३<br>०-१७-०<br>०-१७-०<br>०-१४-५<br>०-१६-८<br>०-१४-५<br>०-०४-३<br>०-०४-३<br>०-०६-८<br>०-०४-५<br>०-१८-९<br>०-०३-८ | ४७०० चौ.मी. | मौजे द्रोणागिरी, सेक्टर क्र. ४१, भूखंड क्र. १३८, क्षेत्र ४७०० चौ.मी. | कै. यशवंत हरि जोशी (मयत) आणि कै. सिताबाई यशवंत जोशी (मयत) यांचे वारस<br>१) श्री. सुरेश यशवंत जोशी<br>२) श्री. रमेश यशवंत जोशी<br>३) श्री. विलास यशवंत जोशी<br>४) श्री. नरेश यशवंत जोशी<br>५) श्री. जगदिश यशवंत जोशी<br>६) श्री. राजेश यशवंत जोशी<br>७) श्री. प्रकाश यशवंत जोशी<br>८) श्री. यतिश यशवंत जोशी<br>९) सौ. मिना नथुराम बंडा<br>१०) सौ. कविता विनायक पाटील | -- |
| ५ | ३२९ रोडपाली | ५९अ | ११२/४ | ०-१३-५ | १०० चौ.मी. | नोड-रोडपाली भूखंड क्र.६ए/आय, सेक्टर-२०, क्षेत्र - १०० चौ.मी. | १. संजय जगन्नाथ पाटील<br>२. राजेश जगन्नाथ पाटील<br>३. किशोर जगन्नाथ पाटील<br>४. कु. वनिता ज्ञानेश्वर पाटील | -- |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रांसह बाब निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी,**
**सिडको भवन, तळ मजला, भूमि विभाग १२.५०%**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**अति. मुख्य भूमी व व भूमापन अधिकारी**
**सिडको/जनसंपर्क/२०७/२०२६-२७**

# तळोजा फेज-१मध्ये अतिक्रमणविरोधी कारवाई

## आठ हातगाड्या, वजनकाटे जप्त




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाच्या वतीने तळोजा फेज-१ येथील सेक्टर १० व सेक्टर ११ परिसरातील फुटपाथवरील अतिक्रमणांविरोधात सोमवारी (दि. ३१) कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान फुटपाथवर अनधिकृतपणे व्यवसायासाठी ठेवण्यात आलेल्या आठ हातगाड्या व चार वजनकाटे जप्त करण्यात आले.

तसेच फुटपाथवरील अतिक्रमणे हटवून नागरिकांच्या सुरक्षित आणि सुलभ वाहतुकीसाठी फुटपाथ मोकळा करण्यात आला. नावडे उपविभागाच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने ही कारवाई करण्यात आली. नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त ठेवणे, पादचाऱ्यांसाठी फुटपाथ उपलब्ध करून देणे आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, या उद्देशाने महानगरपालिकेमार्फत ही कारवाई करण्यात आली.

सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे अतिक्रमण करून वाहतुकीस तसेच पादचाऱ्यांना अडथळा निर्माण करणाऱ्यांविरोधात यापुढेही नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

# नमुंमपाच्या एलबीटी विभागातील व्यवहारांच्या सखोल चौकशीची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या एलबीटी विभागामार्फत २०१५ ते २०१७ तसेच त्यानंतरच्या कालावधीत विविध व्यापारी व आस्थापनांना जारी करण्यात आलेल्या असेसमेंट क्लिअरन्स व एनओसी तसेच संबंधित करआकारणी व करभरणा प्रकरणांचे विशेष फॉरेन्सिक ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी भाजपच्या कोकण विभागीय कामगार मोर्चाचे माजी उपाध्यक्ष सुधीर पाटील यांनी पालिकेकडे केली आहे.

या प्रकरणांमध्ये कोणत्याही प्रकारची प्रशासकीय, आर्थिक किंवा प्रक्रियात्मक अनियमितता झाली आहे किंवा नाही, याची निष्पक्ष व सखोल तपासणी होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नियमित लेखापरीक्षणाऐवजी स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागामार्फत विशेष फॉरेन्सिक ऑडिट करण्याची मागणी करण्यात आली आहे. या ऑडिटमध्ये एलबीटी विभागातील संबंधित सर्व असेसमेंट क्लिअरन्स व एनओसी फाईल्सची तपासणी करून करनिर्धारण, करभरणा, चलन, अधिकृत नोंदी, फाईलवरील मंजुरी, स्वाक्षऱ्या, जावक क्रमांक आणि एनओसी जारी करण्याची प्रक्रिया नियमानुसार झाली होती किंवा नाही, याची पडताळणी करण्यात यावी.

तसेच एनओसीवरील दिनांक व क्रमांकांची आउटवर्ड रजिस्टरमधील नोंदींशी तुलना करून संबंधित व्यापारी अथवा आस्थापनांनी भरलेला कर, चलन क्रमांक, चलनाची तारीख, महानगरपालिकेच्या लेखा नोंदी आणि उपलब्ध बँक व्यवहार यांचीही परस्पर पडताळणी करण्यात यावी. एनओसीवर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संबंधित कालावधीतील नियुक्ती आदेश, पदस्थापना आदेश, बदली आदेश, कार्यमुक्त आदेश व जॉइनिंग रिपोर्ट यांची तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकाऱ्याने एनओसीवर स्वाक्षरी केलेल्या दिवशी ते प्रत्यक्षात एलबीटी विभागात कार्यरत होते किंवा नाही, याची स्वतंत्र प्रशासकीय पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेचा महसूल सुरक्षित ठेवणे, प्रशासकीय पारदर्शकता वाढविणे आणि सार्वजनिक हिताचे संरक्षण करणे या दृष्टीने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन २०१५ ते २०१७ तसेच त्यानंतरच्या कालावधीतील एलबीटी विभागाच्या असेसमेंट क्लिअरन्स व एनओसी प्रकरणांचे विशेष फॉरेन्सिक ऑडिट करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

# राजस्थानच्या अधिकाऱ्यांकडून नमुंमपाच्या ईटीसी केंद्राला भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेचे ईटीसी दिव्यांग शिक्षण प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्र हे एकाच छताखाली विविध प्रकारच्या दिव्यांगांना सेवा सुविधा पुरविणारे केंद्र म्हणून सुपरिचित आहे. त्यामुळे येथे देश-परदेशातील नामांकित व्यक्ती तसेच अभ्यासक भेट देत असतात. दिव्यांगांसाठी करण्यात येणाऱ्या कामांची माहिती घेण्यासाठी राजस्थान शासनाच्या राज्य प्रकल्प संचालक रश्मी शर्मा यांनी सहसंचालक अनिल थानवी व आर्टिफिशियल लिम्ब्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे उपव्यवस्थापक के. डी. गोटे यांच्यासह भेट दिली.



ईटीसी केंद्राच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध दिव्यांग कल्याणकारी योजनांची त्यांनी सविस्तर माहिती घेतली. यावेळी नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिलारे यांनी उपस्थित राहून मान्यवरांना केंद्रामधील दिव्यांग मुलांचे शिक्षण, प्रशिक्षण, उपचार पद्धती तसेच केंद्राचे कामकाज व कार्यपद्धती याविषयी सविस्तर माहिती दिली.रश्मी शर्मा यांनी पाहणीदरम्यान केंद्रामार्फत करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबत प्रशंसा केली तसेच ईटीसी केंद्राच्या धर्तीवर दिव्यांगांसाठी कल्याणकारी योजना सर्वत्र राबविणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त कैलास शिंदे यांनी या भेटीबाबत समाधान व्यक्त केले. या भेटीचे सर्व नियोजन व नियंत्रण केंद्राच्या अधीक्षक व शैक्षणिक व्यवस्थापक यांनी केले.

# जेएनपीएच्या अधिकाऱ्यांकडून डीएफसीची पाहणी

**उरण : वार्ताहर**

बंदरातील मालवाहतूक व्यवस्था अधिक कार्यक्षम बनविण्याबरोबरच कंटेनरची जलदगतीने वाहतूक सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाचे अध्यक्ष गौरव दयाल आणि उपाध्यक्ष रवीश सिंह यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर (डीएफसी)वरील महत्त्वाच्या रेल्वे पायाभूत सुविधांची पाहणी केली. या शिष्टमंडळाने नव्याने विकसित करण्यात आलेल्या खारबाव रेल्वे स्थानकाला भेट देऊन डीएफसीच्या वापरासाठी आवश्यक कार्यात्मक समन्वयाची पाहणी केली.




खारबाव स्थानकाचे धोरणात्मक एकत्रीकरण झाल्यामुळे जेएनपीएमधून भिवंडीतील प्रमुख उपभोग व वितरण केंद्रांकडे कंटेनरयुक्त मालाची वाहतूक अधिक सुरळीत आणि जलद होण्यास मदत होईल. परिणामी मालाच्या वाहतुकीस लागणारा वेळ कमी होण्याबरोबरच रस्त्यांवरील वाहतूक कोंडीही कमी होईल. खारबाव येथील पाहणीनंतर वरिष्ठ नेतृत्वाच्या पथकाने भिवंडीतील प्रमुख वेअरहाऊसिंग हबला भेट देऊन पुरवठा साखळीची क्षमता, लास्ट-माईल लॉजिस्टिक्सची कार्यक्षमता आणि साठवणुकीची तयारी यांचा आढावा घेतला. या पाहणीचा समारोप नवीन निळंजे रेल्वे स्थानकाच्या पाहणीने झाला.

विस्तारत असलेल्या रेल्वे मालवाहतूक व्यवस्थेत हे स्थानक अतिरिक्त महत्त्वाचे मालवाहतूक केंद्र म्हणून कितपत उपयुक्त ठरू शकेल, याचेही यावेळी मूल्यांकन करण्यात आले. या पाहणीदरम्यान बोलताना जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल म्हणाले, आधुनिक बंदरांच्या कार्यक्षम संचालनासाठी प्रभावी मल्टिमोडल कनेक्टिव्हिटी अत्यंत महत्त्वाची आहे. खारभव आणि निळंजे यांसारख्या धोरणात्मक रेल्वे केंद्रांच्या माध्यमातून डीएफसीचा अधिकाधिक वापर करून भिवंडीसारख्या प्रमुख व्यावसायिक केंद्रांपर्यंत कंटेनरची वाहतूक अधिक सुरळीत, जलद आणि पर्यावरणपूरक पद्धतीने करण्यासाठी जेएनपीए प्रयत्नशील आहे.

यावेळी जेएनपीएचे उपाध्यक्ष रवीश सिंह म्हणाले, कंटेनर वाहतुकीतील अधिकाधिक हिस्सा रस्ते मार्गावरून रेल्वेकडे वळवणे हे लॉजिस्टिक्सचा खर्च आणि वाहतुकीस लागणारा वेळ कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आज करण्यात आलेल्या संयुक्त पाहणीमुळे व्यापार आणि उद्योगाच्या वाढीला पाठबळ देणारी सक्षम व विश्वासार्ह अंतर्देशीय वाहतूक जोडणी विकसित करण्याच्या आमच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळाले आहे.

हा उपक्रम पंतप्रधान गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन अंतर्गत जेएनपीएच्या व्यापक उद्दिष्टांशी सुसंगत असून एकात्मिक पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देणे, कार्यक्षमतेत वाढ करणे आणि भारतातील आघाडीचे कंटेनर बंदर म्हणून जेएनपीएचे स्थान अधिक भक्कम करणे या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे.



# भेंडखळच्या विठ्ठल-रखुमाई मंदिरात हरिनाम सप्ताह

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील भेंडखळ येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरात १५८ वर्षांची परंपरा जपणाऱ्या हरिनाम सप्ताह मंडळाच्या वतीने सुरू असलेल्या हरिनाम सप्ताहात टाळ-मृदंगाच्या गजरात भाविक तल्लीन झाले आहेत. २९ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या काळात कृष्ण जन्माष्टमीपर्यंत आठ दिवसांच्या या सप्ताहात भेंडखळ गावातील सुमारे ७७२ भक्त सहभागी होऊन रात्रंदिवस २४ तास सतत भजन, टाळ-मृदंग सुरू ठेवून ही परंपरा अखंडपणे सुरू ठेवली आहे.

हरिनाम सप्ताह मंडळाचे अध्यक्ष उद्धव घरत, काशिनाथ ठाकूर, गोपाळ ठाकूर, अशोक भोईर व मंडळाचे सचिव चंद्रविलास घरत यांच्यासह गावातील तरुण तसेच ज्येष्ठ नागरिकही या हरिनाम सप्ताहात तन-मन लावून पांढऱ्या रंगाचे वस्त्र परिधान करून मोठ्या भक्तिभावाने सहभागी होत आहेत.

# चिंचवलीतील वनवासी आश्रमातील विद्यार्थ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नेरुळ येथील युथ कौन्सिल नेरुळ या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून समर्थ शहा या लहान मुलाच्या वाढदिवसानिमित्त वनवासी कल्याण आश्रम संचलित, पनवेल तालुक्यातील चिंचवली येथील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तूंबरोबरच तांदूळ, डाळ, साखर, गोडेतेल, चहा पावडर आदी दैनंदिन जीवनातील आवश्यक वस्तू वितरित करण्यात आल्या.

आश्रमात एकूण ३१ विद्यार्थी वास्तव्यास असून त्यांना एक वेळचे गोड जेवणही देण्यात आले.संस्थेचे मुख्य सचिव सुभाष हांडे देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष बिक्रम राम यांच्या पुढाकाराने दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी चिंचवली येथील आश्रमाच्या सभागृहात हा उपक्रम पार पडला.

या उपक्रमात आश्रमाचे केंद्रप्रमुख दिलीप बरफ, संस्थेचे जी. आर. पाटील, अशोकराव महाजन, दत्ताराम आंब्रे, दिलीप चिंचोळे, रवींद्र कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मुलांच्या स्वागत गीताने झाली. दिलीप बरफ यांनी आश्रमाच्या कार्याचा आढावा घेऊन मुलांची दिनचर्या व मुलांच्या वैयक्तिक विकासासाठी होत असलेल्या प्रयत्नांची माहिती उपस्थितांना करून दिली.

आदिवासी मुलांनी शिक्षण घेणे ही काळाची गरज असून आदिवासी सुशिक्षित झाला तर देशाच्या प्रगतीलाही चांगला हातभार लागेल, असे त्यांनी सांगितले. दत्ताराम आंब्रे यांनी मुलांशी संवाद साधताना सांगितले की, तुम्ही कष्टपूर्वक चांगले शिक्षण घ्या, शिकून खूप मोठे व्हा, त्यामुळे तुमच्या कुटुंबाबरोबरच देशाचीही प्रगती होण्यास हातभार लागेल. जेव्हा तुम्ही उच्च शिक्षणासाठी या आश्रमातून बाहेर पडाल आणि सर्वार्थाने सक्षम व्हाल तेव्हा या आश्रमात तुम्ही राहिलात आणि स्वतःचा सर्वांगीण विकास घडवून आणलात याची जाणीव ठेवा.

त्यांनी युथ कौन्सिल नेरुळ या संस्थेच्या कार्याची थोडक्यात ओळख करून देत सांगितले की, गेली ३३ वर्षे युथ कौन्सिल संस्थेच्या माध्यमातून या आश्रमातील मुलांना सातत्याने विविध स्तरांवर मदत उपलब्ध करून देण्यात येत आहे. ही संस्थेच्या स्वयंसेवकांसाठी समाधानाची बाब आहे. कारण तुमच्या चेहऱ्यावरील आनंद आम्हा कार्यकर्त्यांना अधिक काम करण्यास प्रोत्साहन देतो. शेवटी दिलीप बरफ यांनी सर्वांचे आभार मानले.

# ज्येष्ठ नागरिक संघाची वर्षासहल उत्साहात




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल शहर यांची दिनांक १९ ऑगस्ट रोजी बी. के. रिसॉर्ट वॉटर पार्क शिळफाटा येथे वर्षा सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीचा जवळपास १०० ज्येष्ठांनी आनंद घेतला. पाण्यातील राईड्स, व्हेव पूल, कारंजे, रेन डान्स, ट्युब राईड्स अशा अनेक प्रकारच्या ॲक्टिव्हिटी तेथे आहेत. सर्वांनी उत्तम प्रकारच्या सकाळच्या नाश्त्याचा आस्वाद घेतला.

नेहमीप्रमाणे बुधवारची साप्ताहिक सभा सहलीच्या स्थळी घेण्यात आली. वाढदिवसही साजरे केले. गाणी, कविता, किस्से सभासदांनी सादर केले. बी.के. रिसॉर्ट वॉटर पार्कचे मॅनेजर आणि स्टाफ यांचा संघातर्फे सन्मान करण्यात आला. बी. के. रिसॉर्ट वॉटर पार्क यांच्या व्यवस्थापनाकडून अध्यक्ष जयवंत गुजर, उपाध्यक्ष माधुरी गोसावी, सचिव सुनील खेडेकेर व सभासद मुकादम यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. संघाचे सचिव सुनील खेडेकर तसेच उपाध्यक्ष माधुरी गोसावी यांनी सहलीसाठी मेहनत घेऊन उत्तमरित्या नियोजन केले होते.



# चिरनेरमधील महागणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील महागणपती हा भक्तांच्या नवसाला पावणारा असल्याने संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने सोमवारी (दि. ३१) दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी प्राचीन जागृत महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. यात शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीही दर्शनाचा लाभ घेतला.

पहाटे ४ वाजता मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. यावेळी प्रथम महागणपतीची महापूजा व महाआरती झाली. त्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. यावेळी मंदिरात भजनांचे सूर ऐकावयास मिळाले. महागणपतीचे देवस्थान अत्यंत पुरातन असून पेशवेकालीन भव्य मंदिरात महागणपती विराजमान आहे. पद्मासनात बसलेली महागणपतीची मूर्ती सुमारे सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद आहे. शेंदूरचर्चित मूर्ती चतुर्भुज असून पूर्वाभिमुख आहे. ही मूर्ती तळ्यात सापडली आहे. या गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांची नेहमीच गर्दी असते.

# कोलिवूडचा 'देवा' गणेशभक्तांच्या भेटीला

**नवी मुंबई : बातमीदार**




गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. याच भक्तिमय वातावरणात लहान मुलांची निरागस किलबिल, श्रद्धेचा ओलावा आणि गणरायाच्या चरणी नतमस्तक होणाऱ्या भक्तिभावाची अनुभूती देणारे 'देवा' हे सुंदर भक्तिगीत रविवारी (दि. ३०) गणेशभक्तांच्या भेटीला आले.

गीत प्रदर्शित होताच अल्पावधीतच या गाण्याने रसिकांचे लक्ष वेधून घेतले असून, सोशल मीडियावरही त्याची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येला कोलिवूड प्रोडक्शनचे प्रवीण कोळी यांच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर हे भक्तिगीत प्रदर्शित करण्यात आले. बाप्पाच्या आगमनाची ओढ, बालमनातील निरागस भक्ती आणि गणरायाच्या चरणी मिळणाऱ्या आध्यात्मिक समाधानाचा भाव या गीतातून अत्यंत हळुवारपणे व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे हे गीत ऐकताना भाविकांना बाप्पाच्या आगमनाचा आनंद आणि भक्तीची अनुभूती एकाच वेळी मिळत आहे.

या गीतात बालकलाकार सांज पाटील आणि प्रितेश कोळी यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या निरागस अभिनयामुळे गीतातील भाव अधिक खुलून आला आहे. प्रसिद्ध बालगायक रेयान वावरे आणि कस्तुरी साईराम यांच्या सुरेल आवाजाने गीताला भावस्पर्शी रंग चढला असून त्यांच्या गायकीतून भक्तिभाव अधिक प्रभावीपणे रसिकांपर्यंत पोहोचतो.

# विद्याभवनमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात; मैदानी खेळांना प्राधान्य देण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थीगृहाच्या विद्याभवन शाळा, नेरूळ येथे कुलसचिव दिनेश मिसाळ यांच्या प्रेरणेने राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मुख्याध्यापिका श्रीजा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख अतिथी रेवप्पा गुरव यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी मेजर ध्यानचंद यांना अभिवादन करून त्यांच्या जीवनातील समर्पण, राष्ट्रप्रेम हे गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत, असे आवाहन केले."खेळामध्ये शिस्तीला पर्याय नाही. विद्यार्थ्यांच्या विकासात खेळाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी मोबाइलचा वापर कमी करून मैदानी खेळ खेळावेत," असे मार्गदर्शन गुरव यांनी केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून शारीरिक, मानसिक व सामाजिक विकासामध्ये क्रीडाचे महत्त्व प्रभावीपणे विशद केले. क्रीडा शिक्षक विनायक मनसुख यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची व क्रीडा क्षेत्रातील योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी क्रीडा विषयावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रश्नमंजुषेत विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमास मुख्याध्यापक गोरख कदम, क्रीडा शिक्षक विनायक मनसुख, जयवंत अगीवले, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक विनायक मनसुख यांनी केले.

# खोपोली पालिकेत १०० कोटींचा गैरव्यवहार

## भाजप नगरसेविका सानिया शेख यांची मुख्यमंत्र्यांकडे चौकशीची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपरिषदेच्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय व आर्थिक अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप भाजप नगरसेविका सानिया मोहसीन शेख यांनी केला आहे . या प्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री, कोकण विभागीय आयुक्त (नवी मुंबई), नगरपरिषद प्रशासन संचालनालय (बेलापूर) आणि अल्पसंख्याक विभागाकडे सविस्तर पुराव्यांसह अधिकृत तक्रार दाखल करून तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



प्रभाग क्र. ६ मधील उर्दू शाळेसमोरील मैदानाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना नगरसेविका सानिया शेख यांनी सांगितले की आमचा मैदानास अथवा खेळाच्या विकासास कोणताही विरोध नाही, तर तेथे उभारण्यात येत असलेल्या धोकादायक लोखंडी रचनेला (स्ट्रक्चर) विरोध आहे.या मैदानाच्या वरून हाय-टेन्शन वीज वाहिनी गेलेली असल्याने लोखंडी खांबांमुळे शालेय विद्यार्थ्यांना व खेळाडूंना शॉक लागून गंभीर अपघाताचा किंवा जीवितहानीचा संभाव्य मोठा धोका निर्माण होऊ शकतो. .

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी हे मैदान एकतर पूर्णपणे खुले (ओपन ग्राउंड) ठेवावे किंवा लोखंडी खांबांऐवजी लाकडी अथवा प्लास्टिक/फायबरच्या खांबांचा वापर करण्यात यावा. अशी पण त्यांनी मागणी केली आहे. तसेच नगरपरिषदेच्या कारभारात पारदर्शकता राहावी आणि नागरिकांसमोर सत्य समोर यावे यासाठी आगामी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा थेट ऑनलाईन (Live) पद्धतीने घेण्यात यावी, अशी लेखी मागणी सानिया शेख यांनी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

यापूर्वी माजी नगराध्यक्ष स्व. लक्ष्मणशेठ साबळे यांच्या नगराध्यक्ष काळात जनतेच्या माहितीसाठी ऑनलाईन सभा घेतल्या जात होत्या. आता त्यांचेच नातू उपनगराध्यक्ष विक्रम साबळे हे पदावर कार्यरत असल्याने त्यांच्याही कार्यकाळात ही सभा ऑनलाईन घेऊन पालिकेतील कथित गैरव्यवहार जनतेसमोर उघड करावा, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. करोडो रुपयांच्या निविदा, कार्यालयीन टिप्पणी व कार्यादेशांवर मुख्याधिकाऱ्यांऐवजी वर्ग-३ च्या कनिष्ठ अभियंते व लिपिकांच्या सह्या घेऊन नियमबाह्य पद्धतीने कामे वाटप करण्यात आली असा आरोप सानिया शेख यांनी केला आहे.

कामाचे देयक काढण्यासाठी पुणे येथील सीओईपी (COEP) तंत्रज्ञान विद्यापीठाच्या नावाने बनावट तपासणी अहवाल तयार करून लाखो रुपयांचे बिल अदा केल्याचा आरोप आहे . टाटा पॉवर व रेल्वेची परवानगी नसताना तसेच मा. उच्च न्यायालयाची स्थगिती (Stay) असतानाही बेकायदेशीर बांधकाम पुढे का रेटण्यात आले ? असाही सवाल करण्यात येत आहे.

शासकीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या जीविताशी खेळ करणाऱ्या संबंधित मुख्याधिकारी व जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने निलंबनाची व फौजदारी (FIR) कारवाई करावी, अशी ठाम मागणी नगरसेविका सानिया शेख यांनी केली आहे .या मैदानावर प्रस्तावित क्रिकेट टर्फच्या कामाची किंमत सुमारे ७३ लाख रुपये असल्याचा उल्लेख उपलब्ध वृत्तांतांमध्ये आहे. या कामाच्या प्रशासकीय मंजुरी, निविदा प्रक्रिया, तांत्रिक तपासणी आणि सुरक्षाविषयक परवानग्यांबाबतही शेख यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

कामाच्या गुणवत्तेच्या तपासणीसाठी पुण्यातील COEP तंत्रज्ञान विद्यापीठाच्या नावाने कथित अहवालाचा वापर करून बिल अदा करण्यात आल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित अहवाल प्रत्यक्षात कधी तयार झाला, प्रत्यक्ष पाहणी झाली होती का आणि अहवाल अधिकृतरीत्या जारी करण्यात आला होता का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणात लाखो रुपयांचे बिल अदा झाल्याचा आरोप असून, कागदपत्रांमधील तारखा, तपासणी अहवाल आणि बिल प्रक्रियेबाबतही आक्षेप नोंदवण्यात आल्याचे वृत्त आहे. मात्र, अहवाल बनावट असल्याचा दावा अधिकृत तपासणीत सिद्ध होणे आवश्यक आहे.

टाटा पॉवर व रेल्वेची आवश्यक परवानगी नसताना तसेच न्यायालयीन स्थगितीचा आदेश असतानाही संबंधित बांधकाम पुढे नेण्यात आल्याचा आरोपही शेख यांनी केला आहे. स्थगिती आदेशाची अंमलबजावणी झाली होती का, त्यानंतर काम सुरू ठेवण्यास कोणाची परवानगी होती आणि बिल कसे मंजूर झाले, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान प्रभाग नंबर५ च्या शिवसेनेच्या (शिंदे गट) नगरसेविका मयुरी शेलार यांनीही या लोखंडी बांधकामास विरोध केला असल्याचे सामाजिक कार्यकर्ते मोहसीन शेख यांनी प्रतिनिधीशी बोलताना माहिती दिली. वीरश्वर मंदिर येथे तयार करण्यात आलेल्या तर्फ ची एकूण किंमत तीस लाख असताना आता तयार करण्यात आलेल्या शाळेजवळील टर्फ ची ७३ लाख रुपये एकूण खर्च कसा असाही त्यांनी सवाल केला आहे.

हे पाहताना अनेक गैरव्यवहार झाल्याचा संशय मोहसीन शेख यांनी व्यक्त केला आहे. भाजपाच्या नगरसेवकांनी केलेल्या आरोपाबाबत नगराध्यक्ष व मुख्याधिकारी काय भूमिका घेतात याकडे खोपोलीकरांचे लक्ष लागले आहे.

# खासदार तटकरेंच्या हस्ते लांढर येथे भवानी मातेच्या मंदिराचे लोकार्पण



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील लांढर येथील पुरातन गावदेवी भवानी मातेच्या मंदिराचा लोकार्पण सोहळा रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते रविवार, दि. ३० रोजी भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात पार पडला. यावेळी ग्रामस्थांसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देताना खा. तटकरे म्हणाले की, पूर्वी वरसेकडून लाढंर येथे येण्यासाठी योग्य रस्ता नव्हता. आपण अध्यक्ष असताना या मार्गाचा रस्ता करण्यात आला. त्यानंतर गावात एकी निर्माण झाली आणि पाणी, रस्ते, गटारे यांसह विविध विकासकामांना गती मिळाली. गावाच्या एकजुटीच्या बळावरच लाढंरचे भाग्य उजळले असून आज येथे दर्जेदार मंदिर साकारलेले पाहून आपल्याला अभिमान वाटतो.दरम्यान, मंदिरालगत असलेल्या तलावाच्या सुशोभीकरणाचे काम आगामी काळात करण्यात येणार असल्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

यावेळी वाशी ग्रामपंचायतीला मिळालेल्या मोठ्या विकासनिधीचा मुद्दा खा. तटकरे यांनी उपस्थित केला. "वाशी ग्रामपंचायतीला तब्बल १३ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. लाढंर गावातील रस्ते तसेच आदिवासी वाडीचा रस्ता याच निधीतून होणे अपेक्षित होते. मात्र अद्याप काही विकासकामे अपूर्ण का राहिली, याची संबंधित विभागाकडून माहिती घेण्यात येईल. ज्याला विचारायचे त्याला विचारत नाही त्यामुळे सबंधित अधिकाऱ्यांना बोलावून निधीचा वापर आणि विकासकामांची वस्तुस्थिती तपासली जाईल, असेही खा. तटकरे यांनी सांगितले. चार ग्रामपंचायतचा विकास निधी एकट्या वाशी ग्रामपंचायतला मिळालेला आहे एवढा मोठा निधी मिळूनही अपेक्षित विकासकामे पूर्ण झालेली नसतील, तर ही बाब गंभीर आहे. त्यामुळे गावदेवी भवानी मातेच्या चरणी शपथ घेऊन सांगतो की, या प्रकरणाची गंभीर दखल घेतो' असा स्पष्ट इशारा खा. तटकरे यांनी दिला.

या सोहळ्यास जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, अलिबाग विधानसभा मतदारसंघाचे कार्याध्यक्ष मनोजकुमार शिंदे, पेण विधानसभा कार्याध्यक्ष प्रमोद म्हसकर, माजी सरपंच अमित मोहिते, सभापती विजया पाशिलकर, सरपंच वंदना वारगुडे, राष्ट्रवादीचे प्रदेश चिटणीस विजयराव मोरे, भाजपाचे तालुकाध्यक्ष अमित घाग, उपसभापती संजय माडलुस्कर, तालुका युवक अध्यक्ष जयवंत मुंढे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालीच्या मध्यवस्तीतील तळ्याचे होणार सुशोभीकरण

**पाली : प्रतिनिधी**

पाली शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या जुन्या तळ्याला आता नव्या रूपात झळाळी मिळणार आहे. पाली नगरपंचायतीच्या माध्यमातून या तळ्यातील गाळ काढण्याचे तसेच सुशोभीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. तळ्याच्या मध्यभागी आकर्षक कारंजे उभारण्यात येणार असून, चारही बाजूंना नागरिकांना बसण्यासाठी व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागात नागरिकांसाठी विरंगुळ्याचे एक नवे ठिकाण उपलब्ध होणार आहे.



माजी खासदार धैर्यशील पाटील आणि आमदार रवींद्र पाटील यांच्या प्रयत्नातून पर्यटन विकास निधीतून हे काम करण्यात येत असल्याची माहिती भाजपचे तालुका प्रमुख श्रीकांत ठोंबरे यांनी दिली.पाली शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या या तळ्याची गेल्या काही काळापासून दुरवस्था झाली होती. तळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने त्याचा वापर आणि परिसराचे सौंदर्य दोन्ही प्रभावित झाले होते. त्यामुळे तळ्याचा विकास करून परिसराला आकर्षक स्वरूप देण्याची मागणी नागरिकांकडून होत होती. अखेर या मागणीची दखल घेत तळ्याच्या विकासाचे काम हाती घेण्यात आले आहे.या कामासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते प्रकाश देसाई, गीता पालरेचा तसेच नगरसेवकांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने तळ्याच्या गाळ काढण्यासह सुशोभीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे.

सुशोभीकरणानंतर तळ्याच्या मध्यभागी कारंजे उभारण्यात येणार असून, चारही बाजूंना नागरिकांसाठी बसण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळी ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच लहान मुलांना येथे काही वेळ निवांत बसता येणार आहे. त्यामुळे शहराच्या मध्यवस्तीत नागरिकांसाठी शांत व रमणीय असे ठिकाण निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पाली शहराच्या सध्याच्या परिस्थितीचा विचार करता, मध्यवस्तीतील या तळयाचे सुशोभीकरण हा शहरातील महत्त्वाचा विकास प्रकल्प ठरणार आहे. शहराच्या मध्यभागी नागरिकांसाठी विरंगुळ्याची जागा निर्माण होण्याबरोबरच परिसराच्या सौंदर्यातही भर पडणार आहे. पालीच्या विकासाच्या दृष्टीने या कामाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, मधली आळी परिसरातील नागरिकांनी या विकासकामाचे स्वागत केले असून, तळ्याचे सुशोभीकरण सुरू झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# कणगुलेतील घरफोडीप्रकरणी आरोपीस अटक; मुद्देमाल हस्तगत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुका पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्यातील मुद्देमाल आरोपीसह हस्तगत करण्यात पोलादपूर पोलीसाना यश मिळाले आहे .

पोलादपूर तालुक्यातील कणगुले गावाच्या हद्दीत दि.१९ ते दि. २७ ऑगस्ट २०२६ दरम्यान पोलादपूर पोलीस ठाणे येथे घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील फिर्यादी अपर्णा अल्पेश तुर्डे यांनी फिर्याद दिल्याने सहायक पोलिस निरीक्षक विजय सुर्वे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तपास सुरू केला. महाड तालुक्यातील धामणे येथील आरोपी राकेश नथुराम भालेकर (वय ३९ वर्षे) याने हा गुन्हा केल्याचे तपासाअंती निष्पन्न झाल्याने पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन तपास केला. यावेळी गुन्ह्यात चोरीला गेलेली सोन्याची चैन तसेच रोख रक्कम असा एकूण १ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी शिताफीने हस्तगत केला आहे.

यात सहायक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मुंडे, सहायक फौजदार कृष्णा जागडे, पोलीस हवालदार स्वप्निल विजय कदम तसेच पोलीस शिपाई अमोल झेपले, सौरव जाधव, तुषार दहिफळे आदी तपास पथकाने तातडीने तपासाची चक्रे फिरवून घरफोडी सारखा गंभीर गुन्हा उघड केल्याने पोलिसांप्रती नागरिकांमध्ये विश्वासार्हता वाढली आहे.

# श्रीवर्धन देवखोल येथील कुसुमेश्वर महादेव मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन, दांडगुरी, नागलोली मार्गे म्हसळा कडे जाणाऱ्या मार्गावरती रसाळवाडी स्टॉप पासून जवळजवळ ५०० मीटर अंतरावरती देवखोल येथील कुसुमेश्वर महादेव मंदिर अत्यंत प्राचीन असे आहे. सदर मंदिराचा परिसर चारही बाजूंनी घनदाट जंगलांनी वेढलेला आहे. मंदिरापासून थोडे पुढे गेल्यावरती देवखोल हे गाव आहे. आज तिसरा श्रावणी सोमवार असल्यामुळे भाविकांनी या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. श्रीवर्धन तालुक्यातील अनेक भाविक श्रावण महिन्यात आवर्जून या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात. आता मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून, त्या ठिकाणी असलेल्या अनेक पाषाणमूर्ती आता एका स्वतंत्र मंदिरामध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत.

यामध्ये एका पाषाणाच्या मूर्ती वरती सूर्य आणि चंद्र यांची चित्र आहेत. वावे पंचतन येथील दिवंगत शिक्षक विश्वास केशव पेंडसे हे चंद्र व सूर्याच्या मूर्तीबद्दल माहिती सांगत असत. जोपर्यंत या ब्रह्मांडामध्ये चंद्र, सूर्य अस्तित्वात आहेत तोपर्यंत हे कुसुमेश्वर मंदिर देखील अस्तित्वात राहील. असा त्याचा अर्थ आहे. मंदिराच्या एका बाजूला पाटाच्या पाण्यावर जगणाऱ्या सुपारीच्या बागा आहेत. या ठिकाणच्या पाटाला बारा महिने पाणी असते. हे झरे अखंडितपणे जिवंत असतात. कुसुमेश्वराचे लिंग जमिनीच्या सपाटीपासून सात ते आठ फूट खाली आहे. सध्या पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे या ठिकाणी पाणी भरलेले दिसत नाही. नाहीतर कुसुमेश्वराचे लिंग पावसाळ्यामध्ये नेहमी पाण्यामध्येच असलेले पाहायला मिळते.

श्रीवर्धन तालुक्यात पर्यटक मोठ्या प्रमाणावर येतात परंतु त्यांना देवखोल येथील कुसुमेश्वर मंदिराची माहिती नसल्यामुळे पर्यटक त्या ठिकाणी जात नाहीत. राज्याच्या पर्यटन विभागाने कुसुमेश्वर मंदिराची माहिती श्रीवर्धन तालुक्यातील विविध मार्गावरती फलक लावून देणे आवश्यक आहे. श्रीवर्धन चिखलप, दांडगुरी मार्गे बोरली पंचतन या मार्गावरती नागलोली गावाकडे जाणारा फाटा आहे. या फाट्यापासून केवळ चार किलोमीटर अंतरावरती हे मंदिर आहे. त्या ठिकाणचे नैसर्गिक वातावरण बघून पर्यटक सुद्धा या ठिकाणाला निश्चित भेट देतील.गरज आहे ती स्थानिक पर्यटन व्यावसायिकांनी पर्यटकांना माहिती दिल्यास पर्यटक या धार्मिक स्थळाचा आंनद घेऊ शकतील.



# माणगावात अखिल बुरुड समाज प्रतिष्ठानचा मेळावा

## पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते उद्घाटन



**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचे व मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगाव येथे अखिल बुरुड समाज प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित भव्य बुरुड समाज मेळावा रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी मानस बॅकेट हॉल, माणगाव येथे समाज बांधवांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात व मोठ्या उत्साहात पार पडला.

ढोल-ताशांच्या गजरात या मेळाव्याचे उद्घाटन रायगडचे पालकमंत्री तथा मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी चंद्रपूरचे आमदार किशोरभाऊ जोरगेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या बुरुड समाज बांधवांनी मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

मेळाव्यात ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान म्हणून छत्री भेट देण्यात आली तसेच दहावी व बारावीमध्ये ९० टयांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना दप्तर व वह्या, तर सहावी ते नववीतील विद्यार्थ्यांसह उच्चशिक्षित तरुणांचा विशेष सत्कार करण्यात आला. समाजासाठी विशेष योगदान देणारे नगरसेवक, उद्योजक व प्रतिष्ठित व्यक्तींचा 'समाजभूषण पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास उद्योजक सदानंद गायकवाड (उरण) तसेच उद्योजक व निवृत्त सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रदीप माने (पनवेल) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.नागपूर, चंद्रपूर, कोल्हापूर, पुणे, नाशिक, मुंबई, पनवेल, ठाणे, खेड, चिपळूण, दापोली तसेच रायगड जिल्ह्यातून आलेल्या समाज बांधवांचा विशेष सन्मान संघटनेचे अध्यक्ष आबासाहेब पवार, महासचिव प्रकाश माने, खजिनदार राजेंद्र नागे, जिल्हा प्रमुख संदिभाई नागे व तालुका प्रमुख संदेश महाले यांच्या हस्ते करण्यात आला.



## वार्तालाप

**पुणे : भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक पुणे येथे सोमवारी झाली. बैठक सुरू होण्यापूर्वी मोकळ्या वातावरणात भारतीय जनता पक्षाचे युवा नेते परेश ठाकूर व खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी वार्तालाप केला.**

# श्री गृह महिला उद्योग समूहाची भरारी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील महिलांचा श्री गृह महिला उद्योग समूह गेल्या ६ वर्षांपासून दिवाळी फराळाचा व्यवसाय करत आहे. माणगाव क्लस्टर डेव्हलपमेंट सेंटर, भादाव यांच्या माध्यमातून अमेरिकेतील बोस्टन येथील लेहेरे ग्रुपने या महिला उद्योजकांना अद्ययावत यंत्रसामग्री, तज्ज्ञ प्रशिक्षण व व्यवसायवृद्धीसाठी आर्थिक मदत उपलब्ध करून दिली.



२९ ऑगस्ट रोजी पुण्यातील कोल्हटकर कुटुंबाच्या अमेय फूडच्या अदिती ताई व चैत्राली ताई यांच्या मार्गदर्शनाखाली चकली, चिवडा, लाडू व शंकरपाळी यांसारख्या दिवाळी फराळाचे प्रशिक्षण घेण्यात आले. महिलांनी प्रत्यक्ष फराळ तयार करून प्रशिक्षणाचा अनुभव घेतला.या उपक्रमासाठी विद्या भुरंबे, तन्वी सुर्वे, सुमन धुरी व अर्चना जोशी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अमिता मिशी यांनी व्यवसायवृद्धीसाठी सेवा सहयोग व पोस्कोच्या सहकार्याची माहिती दिली.

कोकणी तानाबाना, जादुई गुल्लक व फणसफा या उपक्रमांनंतर 'अन्नपूर्णा' हा महिलांचा अन्नपदार्थ निर्मिती उद्योगाचा उपक्रम माणगाव तालुक्यातील अनेक महिला गटांसाठी रोजगार व स्वावलंबनाचे नवे दालन ठरणार असल्याचे मंगलजी मेहता यांनी सांगितले. माणगाव तालुक्यातील अनेक महिला गटांनी श्री गृह उद्योग समूहानी तयार केलेला फराळ विक्री करून उत्पन्न मिळवावे, असे अभय कोल्हटकर यांनी आवर्जून सांगितले.प्रशिक्षणानंतर महिलांनी सकारात्मक ऊर्जा आणि नव्या आत्मविश्वासाने व्यवसायवृद्धीसाठी कामाला सुरुवात केली आहे.

## महिला टी-२० आशिया कप क्रिकेट स्पर्धा

# भारताचा थायलंडवर एकतर्फी विजय

**दुबई : वृत्तसंस्था**

महिला टी-२० आशिया कप २०२६च्या सलामीच्या सामन्यात भारतीय क्रिकेट संघाने थायलंडचा ९४ धावांनी पराभव करत स्पर्धेची दमदार सुरुवात केली. भारताने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत नऊ विकेट्स गमावत १५९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात थायलंडचा डाव अवघ्या ६५ धावांत १५.३ षटकांत आटोपला.



भारताच्या विजयाची प्रमुख शिल्पकार ठरली शेफाली वर्मा. तिने अवघ्या ३६ चेंडूंत ६४ धावांची आक्रमक खेळी केली. या खेळीत तिने आठ चौकार आणि तीन षटकार ठोकले. शेफालीने सुरुवातीपासूनच थायलंडच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला. भारताची दुसरी सलामीवीर स्मृती मंधाना १० चेंडूंत १९ धावा करून धावबाद झाली. तिने चार चौकारांसह चांगली सुरुवात केली होती, मात्र नॉन-स्ट्रायकर एंडवर थेट थ्रो लागल्याने तिची खेळी संपली.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या प्रतीका रावलने १८ चेंडूंत २२ धावा केल्या. भारती फुलमालीने १३ धावा केल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरला केवळ पाच धावा करता आल्या, तर रिचा घोष खाते न उघडताच बाद झाली. अखेरीस क्रांती गौडने नाबाद १५ धावांची खेळी करत भारताची धावसंख्या १५९पर्यंत पोहचवली.

१६० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना थायलंडच्या फलंदाजांना भारतीय गोलंदाजांसमोर फार काळ टिकता आले नाही. नन्नापत कोंचारोएनकाईने ४६ चेंडूंत ४० धावा करत एकाकी झुंज दिली, मात्र दुसऱ्या बाजूने तिला अपेक्षित साथ मिळाली नाही. फॅनिटा मायाने सहा, तर सुथिरुआंगने पाच धावा केल्या. नियमित अंतराने विकेट्स पडत गेल्याने थायलंडचा डाव ६५ धावांवर संपुष्टात आला. नन्नापतला दीप्ती शर्माने बाद करत थायलंडच्या डावावर पडदा टाकला.

या ९४ धावांच्या मोठ्या विजयासह भारताने महिला टी-२० आशिया कपच्या मोहिमेला विजयी सुरुवात केली आहे. आता भारतीय संघाचे लक्ष आगामी बहुप्रतिक्षित भारत-पाकिस्तान सामन्याकडे लागले आहे. थायलंडविरुद्धच्या दमदार कामगिरीमुळे पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यापूर्वी भारतीय संघाचा आत्मविश्वास उंचावला आहे.

# दुलीप ट्रॉफीत वैभवची टी-२० स्टाईल फटकेबाजी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**



आयपीएल आणि टी-२० क्रिकेटमध्ये आपल्या फलंदाजीची कमाल दाखवल्यानंतर आता वैभव सूर्यवंशीने आव्हानात्मक समजल्या जाणाऱ्या प्रथमश्रेणी क्रिकेटमध्येही आपल्या कौशल्याची चुणूक दाखवण्यास सुरुवात केली आहे. दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेत पूर्व विभाग आणि मध्य विभाग यांच्यात सुरू असलेल्या उपांत्य लढतीत वैभवने तुफानी फटकेबाजी करत चौकार षटकारांची बरसात करून टी-२० स्टाईलमध्ये अर्धशतक फटकावले.

या सामन्यात मध्य विभागाचा डाव २६६ धावांवर आटोपल्यानंतर सर्वांचे लक्ष वैभव सूर्यवंशीकडे लागले होते. वैभवनेही या सामन्यात आपल्या चाहत्यांची निराशा न करता सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन घडवले. वैभव सूर्यवंशी आणि अनुभवी अभिमन्यू ईश्वरन यांनी मध्य विभागाच्या गोलंदाजांवर वर्चस्व राखले. यादरम्यान या दोघांनीही आठ षटकांमध्येच संघाचे अर्धशतक फलकावर लावले.

यादरम्यान वैभवने प्रथमश्रेणी क्रिकेटला अनुसरून आक्रमणासोबतच प्रसंगी संयमी फलंदाजी करत खेळपट्टीवर जम बसवला तसेच पाच चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ४२ चेंडूंतच आपले अर्धशतक पूर्ण केले. वैभवने पंधराव्या षटकातील शेवटच्या चेंडूवर सारांश जैनला खणखणीत षटकार ठोकून आपले अर्धशतक फलकावर लावले. सोबतच पहिल्या गड्यासाठी अभिमन्यू ईश्वरनसोबत शतकी भागीदारीही पूर्ण केली.

**५७ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला**

देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वात प्रतिष्ठित स्पर्धेत कमी वयात अर्धशतक झळकवण्याचा विक्रम वैभव सूर्यवंशीने आपल्या नावे केला. दुलिप करंडक स्पर्धेत याआधी सर्वाधिक कमी वयात अर्धशतक झळकवण्याचा विक्रम लक्ष्मण सिंग या दिग्गजाच्या नावे होता. १९६९मध्ये त्यांनी १६ वर्षे आणि २३ दिवस वयात या स्पर्धेत शतक झळकावले होते. ५७ वर्षांपूर्वीचा हा विक्रम वैभवने मोडीत काढला. त्याने १५ वर्षे १५७ दिवस वयात हा डाव साधला. या सामन्यात वैभवला शतकी डाव साधण्याची संधी होती, पण मोठा फटका मारण्याच्या नादात वैभवने आपली विकेट गमावली. त्याने ८१ चेंडूत ९२ धावांची खेळी केली. त्याचे शतक अवघ्या आठ धावांनी हुकले.

# तायक्वांदो स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या स्वस्तिक सिंगला सुवर्णपदक



**खारघर : रामप्रहर वृत्त**

२५व्या रायगड जिल्हा क्योरुगी तायक्वांदो चॅम्पियनशिप २०२६मध्ये स्वस्तिक सुजित कुमार सिंग याने उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. ही स्पर्धा नुकतीच काळभैरव मंगल कार्यालय, कळंबोली येथे रायगड तायक्वांदो असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

स्वस्तिक सिंग याने योद्धा तायक्वांदो अकादमीचे प्रतिनिधित्व करत कॅडेट बॉईज, अंडर ६५ किलो वजन गटातील क्योरुगी प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. या उल्लेखनीय यशाच्या जोरावर त्याची सन २०२६-२७मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील क्योरुगी तायक्वांदो चॅम्पियनशिप अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल स्वस्तिक तसेच त्याला मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक अपूर्व अग्रवाल यांचे संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

# तिवाना क्लबने एमएफए फर्स्ट डिव्हिजन चषक जिंकला

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई फुटबॉल असोसिएशन (एमएफए) फर्स्ट डिव्हिजन चषक २०२६च्या अंतिम सामन्यात तिवाना फुटबॉल क्लबने मुंबई युनाइटेड एफसीचा १-० असा पराभव करत विजेतेपद पटकावले.



वांद्रे पूर्व येथील नेव्हिल डि'सूजा फुटबॉल मैदानावर खेळल्या गेलेल्या या अटीतटीच्या सामन्यात तिवाना फुटबॉल क्लबच्या खेळाडूंनी उत्कृष्ट संघभावना, शिस्त आणि झुंजार वृत्तीचे प्रदर्शन केले. टीमने निर्णायक गोल नोंदवत शेवटपर्यंत आपली आघाडी कायम ठेवली आणि प्रतिष्ठित एमएफए फर्स्ट डिव्हिजन चषक आपल्या नावावर केला.

हा विजय तिवाना फुटबॉल क्लबसाठी अत्यंत विशेष आहे, कारण मागील वर्षी टीमने मुंबई फुटबॉल असोसिएशन सेकंड डिव्हिजनच्या फायनलमध्ये शानदार विजय मिळवून विजेतेपद पटकावले होते. सलग दुसऱ्या वर्षी फायनल जिंकून टीमने आपल्या विजयी प्रवासात आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे.

# लॉर्ड्स कसोटीत पाकिस्तानचा दारूण पराभव

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या लॉर्ड्स कसोटीत पाकिस्तानला दारूण पराभवाचा सामना करावा लागला आहे. ३८९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संपूर्ण संघ अवघ्या १९४ धावांत ऑलआऊट झाला. या पराभवासह पाकिस्तान वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या (डब्ल्यूटीसी) फायनलच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे.



पाकिस्तानकडून सौद शकीलने सर्वाधिक ९७ धावांची झुंज दिली. त्याच्याशिवाय शान मसूदने २६ धावांचे योगदान दिले, मात्र इतर फलंदाजांना इंग्लंडच्या गोलंदाजांसमोर फार काळ टिकता आले नाही. इंग्लंडकडून ओली रॉबिनसनने चार, जोश टंगने तीन आणि जोफ्रा आर्चरने दोन विकेट्स घेत पाकिस्तानचा डाव गुंडाळला.

लॉर्ड्स कसोटीत इंग्लंडने पहिल्या डावात २९० धावा केल्या. त्यानंतर इंग्लंडच्या गोलंदाजांनी पाकिस्तानला पहिल्या डावात केवळ ११० धावांवर रोखले. त्यामुळे इंग्लंडला पहिल्या डावात तब्बल १८० धावांची आघाडी मिळाली. दुसऱ्या डावात इंग्लंडने २०८ धावा करत पाकिस्तानसमोर ३८९ धावांचे आव्हान ठेवले. दुसऱ्या डावात इंग्लंडच्या डॅन लॉरेन्सने ७० चेंडूंत ५४ धावा केल्या. हॅरी ब्रुकने ३४, एमिलियो गेने ३१, तर कर्णधार जो रूटने २४ धावांचे योगदान दिले. पाकिस्तानकडून मोहम्मद अब्बासने ५७ धावांत पाच विकेट्स घेतल्या. खुर्रम शहजाद आणि मोहम्मद अली यांनी प्रत्येकी दोन विकेट्स मिळवल्या.

**डब्ल्यूटीसी फायनलचा मार्ग बंद**

लॉर्ड्सवरील पराभव पाकिस्तानसाठी मोठा धक्का मानला जात आहे. या पराभवासह पाकिस्तान वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलच्या शर्यतीतून अधिकृतपणे बाहेर झाला आहे. डब्ल्यूटीसी गुणतालिकेत पाकिस्तानची स्थिती खराब असून त्याची विजयी टक्केवारी केवळ १९.०५ टक्के आहे. या सत्रात पाकिस्तानने आतापर्यंत सात कसोटी सामने खेळले असून त्यापैकी केवळ दोन सामने जिंकले आहेत, तर पाच सामन्यांत पराभव पत्करावा लागला आहे.

# नोवाक जोकोव्हिचचा धक्कादायक पराभव



**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

दिग्गज टेनिसपटू नोवाक जोकोव्हिचला २०२६ यूएस ओपनच्या पहिल्याच फेरीत धक्कादायक पराभवाचा सामना करावा लागला. आर्थर अॅशे स्टेडियमवर अर्जेंटिनाच्या मारियानो नवोनेने जोकोव्हिचचा तब्बल पाच सेटच्या रंगलेल्या सामन्यात पराभव केला. पहिल्याच फेरीतील पराभवामुळे जोकोव्हिचला स्पर्धेबाहेर व्हावे लागले. या पराभवानंतर जोकोव्हिच मैदानातच रडताना दिसला, ज्याचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

दोन सेटमध्ये १-२ अशी आघाडी घेतल्यानंतर जोकोव्हिचला पुढील दोन्ही सेट गमवावे लागले. ३९ वर्षीय सर्बियन खेळाडूचा ७-६(५), ५-७, ४-६, ६-२, ६-१ असा पराभव झाला. न्यूयॉर्कमध्ये चार वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या जोकोव्हिचसाठी हा पराभव मोठा धक्का मानला जात आहे. या पराभवासह जोकोव्हिचची ग्रँडस्लॅम स्पर्धांमधील पहिल्या फेरीत विजय मिळवण्याची तब्बल २० वर्षांची मालिका संपुष्टात आली. नवोनेविरुद्धच्या सामन्यापूर्वी जोकोव्हिचने आपल्या ८२ ग्रँडस्लॅम पहिल्या फेरीतील सामन्यांपैकी तब्बल ८० सामने जिंकले होते. त्याचा पहिल्या फेरीतील अखेरचा पराभव २००६च्या ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये पॉल गोल्डस्टीनविरुद्ध झाला होता.

# दीप्ती शर्मा बनली महिला टी-२०मधील 'नंबर वन' बॉलर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्माने महिला टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत थायलंडची थिपाचा पुथावोंग हिला मागे टाकत अव्वल स्थान पटकावले आहे. महिला आशिया कप २०२६ स्पर्धेत थायलंडविरुद्धच्याच लढतीत दीप्तीने सात निर्धाव चेंडूंसह तीन विकेट्स घेत ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली.



दीप्तीने अवघ्या १.१ षटकांत तीन विकेट्स घेत थायलंडचा खेळ खल्लास केला. विशेष म्हणजे, एकही धाव न देता तीन विकेट्स घेण्याचा पराक्रम करत तिने महिला टी-२० क्रिकेटमध्ये आपल्या विकेट्सची संख्या १७१वर नेली आणि थायलंडची थिपाचा पुथावोंग हिला मागे टाकत सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत अव्वल स्थान पटकावले.

महिला क्रिकेटमध्ये यापूर्वी २६ वेळा असा स्पेल पाहायला मिळाला आहे, मात्र भारताकडून एकही धाव न देता तीन विकेट्स घेण्याचा पराक्रम करणारी दीप्ती शर्माही पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली आहे. थिपाचा पुथावोंगने या सामन्यात एक विकेट घेतली. त्यामुळे तिच्या नावावर १७० विकेट्स असून ती या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे.

# अभिषेक शर्माची तडाखेबंद फलंदाजी, तरीही संघ पराभूत

**मोहाली : वृत्तसंस्था**

शेर-ए-पंजाब टी-२० लीग स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात अमृतसर सुरमाचा कर्णधार आणि भारतीय टी-२० संघातील स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्माचा धमाकेदार अंदाज पाहायला मिळाला. मोहालीच्या स्टेडियमवर मोहाली किंग्सविरुद्ध झालेल्या सामन्यात त्याने अवघ्या २६ चेंडूंत ७७ धावांची वादळी खेळी केली.



मोहाली किंग्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर कर्णधार अभिषेक शर्माने विकेटकीपर-बॅटर सहज धवनच्या साथीने अमृतसर सुरमाच्या डावाची सुरुवात केली. अभिषेकने सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी करताना सहा खणखणीत चौकार आणि सात गगनचुंबी षटकारांच्या मदतीने अवघ्या २६ चेंडूंत ७७ धावांची वादळी खेळी केली. त्याचा स्ट्राइक रेट तब्बल २९६.१५ इतका होता.

आशियाई क्रीडा स्पर्धेआधी शेर-ए-पंजाब टी-२० लीगमध्ये त्याने तुफान फटकेबाजीचा नजराणा पेश करत पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर धमाका करण्यासाठी सज्ज असल्याचे संकेत दिले. त्याची ही खेळी टीम इंडियासाठी दिलासादायक आहे, मात्र या सामन्यात अभिषेकच्या नेतृत्वाखालील अमृतसर संघाला धावफलकावर तब्बल २५८ धावा उभारूनही पराभवाचा सामना करावा लागला.

# स्मरन रविचंद्रनने टिपला शानदार झेल



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

देशांतर्गत क्रिकेटमधील मानाची स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुलीप ट्रॉफी स्पर्धेत साऊथ झोन आणि नॉर्थ झोन संघांमध्ये दुसऱ्या सेमीफायनलचा सामना रंगला. या सामन्यात क्षेत्ररक्षण करताना स्मरन रविचंद्रनने स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करताना भन्नाट झेल घेतला, ज्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

नॉर्थ झोन संघाने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या नॉर्थ झोन संघाला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला होता. सनात सांगवान स्वस्तात माघारी परतला. नॉर्थ झोनकडून अब्दुल समद पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी आला होता. या डावात तो १९ चेंडूत १६ धावांवर फलंदाजी करत होता. त्यावेळी २५वे षटक टाकण्यासाठी फिरकी गोलंदाज श्रेयस गोपाल गोलंदाजीला आला.

या षटकातील चौथा चेंडू टप्पा पडताच बाहेर निघाला. या चेंडूवर अब्दुल समदने कट शॉट मारण्याचा प्रयत्न केला, मात्र चेंडू बॅटची कडा घेऊन स्लिपमध्ये असलेल्या स्मरनच्या हातात गेला. झेल तसा इतका कठीण नव्हता, पण त्याने एका हाताने झेल पकडण्याचा प्रयत्न केला. त्याने उजव्या हाताने झेल पकडताना डाईव्ह मारली. या प्रयत्नात चेंडू त्याच्या हातून सुटला, परंतु तोल गेला असतानाही त्याने हवेतच चेंडू पकडला. त्याच्या या झेलचे जोरदार कौतुक होत आहे.

# डब्ल्यूटीसी गुणतालिकेत इंग्लंड सहाव्या स्थानी

**लंडन : वृत्तसंस्था**

लॉर्ड्सच्या ऐतिहासिक कसोटी सामन्यात यजमान इंग्लंडने पाकिस्तानचा १९४ धावांनी पराभव केला. सलग दुसऱ्या विजयासह इंग्लंडने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) २०२५-२७च्या गुणतालिकेत ६२ गुण आणि ३४.४४ विजयी टक्केवारीसह सहाव्या स्थानावर झेप घेतली आहे.

डब्ल्यूटीसी गुणतालिकेत ऑस्ट्रेलिया ८० विजयी टक्केवारीसह अव्वल स्थानावर आहे. गतविजेता दक्षिण आफ्रिका चार सामन्यांत तीन विजय आणि एका पराभवासह ७५ टक्के विजयी टक्केवारीसह दुसऱ्या स्थानावर आहे. न्यूझीलंड सहा सामन्यांत चार विजय आणि एका पराभवासह ७५ टक्के विजयी टक्केवारीवर आहे. बांगलादेश सहा सामन्यांत तीन विजय आणि दोन पराभवांसह ५५.५६ टक्के विजयी टक्केवारीसह चौथ्या स्थानावर आहे. भारतीय संघ ११ सामन्यांत पाच विजय आणि चार पराभवांसह पाचव्या स्थानी आहे. टीम इंडियानंतर आता इंग्लंडचा नंबर लागतो. पाकिस्तानचा संघ १६ गुण आणि १६.६७ विजयी टक्केवारीसह तळाशी आहे.

# रॉजर फेडररचा 'टेनिस हॉल ऑफ फेम'मध्ये समावेश

**न्यूपोर्ट : वृत्तसंस्था**

ऱ्होड आयलंडमधील न्यूपोर्ट येथे 'इंटरनॅशनल टेनिस हॉल ऑफ फेम'मध्ये समावेश होताना २० वेळा ग्रँडस्लॅम विजेतेपद पटकावणाऱ्या रॉजर फेडररला अनेकदा अश्रू अनावर झाले. आपल्या नेत्रदीपक कारकिर्दीवर आणि आपला प्रवास घडवणाऱ्या लोकांवर त्याने या भावपूर्ण सोहळ्यात भाष्य केले.



'हॉल ऑफ फेम'च्या ऐतिहासिक 'हॉर्सशू कोर्ट'वर झालेल्या या सोहळ्यात माजी टेनिसपटू आणि समालोचक मेरी कॅरिलो यांच्यासोबत फेडररचाही समावेश करण्यात आला. सुमारे ३० मिनिटांचे भाषण देण्यासाठी मंचावर येण्यापूर्वी त्याची पत्नी मिर्का हिने त्याचा परिचय करून दिला.

फेडररच्या कारकिर्दीत आठ विम्बल्डन विजेतेपदे, सहा ऑस्ट्रेलियन ओपन जेतेपदे, पाच यूएस ओपन आणि एका फ्रेंच ओपन विजेतेपदाचा समावेश होता. त्याने 'करिअर ग्रँडस्लॅम' पूर्ण केले आणि २० ग्रँडस्लॅम एकेरी विजेतेपदे जिंकणारा पहिला पुरुष टेनिसपटू ठरला होता. त्याने १०३ एटीपी टूर विजेतेपदांसह आपली कारकीर्द गाजवली आणि एटीपी क्रमवारीत ३१० आठवडे अव्वल स्थान भूषवले होते. यामध्ये सलग २३७ आठवडे 'वर्ल्ड नंबर १' राहण्याच्या विक्रमाचाही समावेश आहे.

फेडररसोबत मेरी कॅरिलो यांचाही समावेश करण्यात आला, ज्यांना 'योगदानकर्ता' श्रेणीत आंतरराष्ट्रीय टेनिस हॉल ऑफ फेममध्ये स्थान मिळाले. क्रीडा प्रसारणात एक प्रतिष्ठित कारकीर्द घडवण्यापूर्वी कॅरिलो एक माजी व्यावसायिक खेळाडू होत्या.

*हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठ्या सन्मानांपैकी एक आहे. याला 'हॉल ऑफ फेम' (प्रसिद्धीचे दालन) म्हटले जाते, पण प्रसिद्धी हे कधीच माझे ध्येय नव्हते. माझे ध्येय असे होते की, मला आवडणारी गोष्ट करत आयुष्य घालवावे आणि ती गोष्ट माझ्याइतकीच आवडणाऱ्या लोकांसोबत असावी.*

**-रॉजर फेडरर**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com